म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ब्रा८४. ना.
दा. क्र. ३५८९

IRBK-0103589

सन-१९५१.

क्र. नं. १३८८३
ता. नं. ..........
११/१/५२

११/११/७६

म. ग्रं. सं. ... वाचनालय ...
ग्रा. क्र. ३५८२ ओ दि ..........
वि. वा. वा. ..........

आ-५१३५६

हृदयांतलीं शब्दचित्रं-३

# मायेची किमया

[ नमुनेदार मराठी शब्दचित्रें ]

लेखक

रघुवीर सामंत

[ नवव्या-दहाव्या यत्तांसाठीं पुरवणी वाचन ]

★

—विद्यार्थी मार्गदर्शन—

श्री. रघुवीर सामंत, बी. ए. बी. टी.

[ माजी मराठी अध्यापक, चिकित्सक स.शि. हायस्कूल, मुं. ४ ]

श्री. गोविंद जगन्नाथ सामंत, बी.ए. (ऑ.), बी.टी., एल्‌एल्.बी. (ठाणें)

IRBK-0103589

दीपावलि १८७३ ] पुष्प १५ वे [ मूल्य १ रु.

—अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन—

कुमार श्रेणी - - मनोरंजन

सौ. स्नेहल सामंत, पी. ए.
यांनीं
'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' करितां
१४बी, हरजीवनदास एस्टेट,
व्हिन्सेन्ट रोड, दादर, मुंबई १४,
येथें प्रसिद्ध केलें.

या व पुढील सर्व आवृत्त्यांचे सर्व प्रकारचे हक्क
सौ. स्नेहल सामंत, पी. ए.
संचालक 'अमर ज्योति वाङ्मय प्रकाशन' यांजकडे

श्री. रघुनाथ ज. सामंत, बी.ए.बी.टी.
यांनी
सागर साहित्य छापखाना,
२०, त्रिभुवन रोड, मुंबई ४,
येथें मुद्रित केलें.

# मायेची किमया

## मंत्र—( विषय )

किमया करून क्षुल्लक गोष्टींतून मौल्यवान सोनें तयार करतां येतें. प्रेम —स्त्रीप्रेम—ती माया फार प्रभावी आहे. या मायेच्या किमयेमुळेंच मानवी जीवन दिव्य, अद्भुततापूर्ण व सुखमय असें झालें आहे. वात्सल्य, बंधु-भगिनी-प्रेम, पति-पत्नी प्रेम, हीं सर्व स्त्रीच्या या मायेचींच स्वरूपें ! त्या मायेच्या किमयेनेंच माणसाच्या जीवनांत क्षुल्लक गोष्टींतूनहि क्षणाक्षणाला दिव्यत्व निर्माण होत असतें. या विचारप्रणालीनें आणि या दृष्टिकोनांतूनच आपण या '**मायेची किमया**' पुस्तकाचा आस्वाद घेतला पाहिजे.

ही मायेची किमया शिक्षणावर अवलंबून नसते; ती गरीबी-श्रीमंती जाणत नाहीं; ती सुख-दुःख ओळखत नाहीं. स्त्रियांच्या ठायीं ही माया सर्वत्र विपुल प्रमाणांत आढळायचीच! तो त्यांचा नैसर्गिक असा प्रभावी भावच असतो. त्या अशिक्षित असोत सुशिक्षित असोत, गरीब असोत श्रीमंत असोत, सुखांत असोत वा दुःखांत असोत, त्यांच्याठायीं असलेल्या या नैसर्गिक मायेनेंच त्या दिव्य किमया करणारच! प्रत्यक्ष कांहीं स्त्रिया वा त्यांच्या आयुष्यांतीलच कांहीं घटना यांच्या आकर्षक शब्दचित्रांच्या रूपानें हीच स्त्रियांच्या 'मायेची किमया' येथें तुमच्यासमोर उभी राहणार आहे.

'**लडकी**'—**भंगीण**, '**भागू**'—**कोळीण**, '**मैना**'—**माळीण**, '**गंगा**'—**पाटीवाली** या चौघी अशिक्षित कामकरी स्त्रियांच्या प्रतिनिधी तर '**निखळलेली चांदणी**' मधील माई किंवा '**तुटलेली तारका**'—**तारा**, या दोघी म्हणजे अर्धशिक्षित पांढरपेशा स्त्रियांचे नमुनेदार मासले. आपल्या मुलीच्या आयुष्याचाहि '**तोच इतिहास ?**' होणार का अशी काळजी करणारी कालिंदी ही मध्यमवर्गीय सामान्य शिकलेली स्त्री !—

पण या सर्वांच्याच आयुष्याचा मध्य मंत्र मात्र एकच व एकाच प्रकारचा आढळतो. तो म्हणजे त्याग व प्रेम !

म्हणूनच '**घरोघरच्या देवी**' या अंतरच्या विचार प्रधान शब्द-चित्रांत तुम्हाला हीं पुढील समारोपात्मक अर्थपूर्ण वाक्यें अढळतील --

" कन्या, पत्नी, माता, सर्व भूमिकांतून जाताना---स्त्री ही अभावितपणें मुख्यत: मातेच्याच दयार्द्र वृत्तीनें वागत असते !--

दुव्या-दुव्यानेंच जग वाढतं-जगतं, वाढलं-जगलं, वाढेल-जगेल.--

स्त्रीचा विकार जग निर्माण करतो !

-तिचा त्याग जगाचा प्रतिपाळ करतो !-

--तिचा विचार जगांतील दिव्यत्वाची वाढ करतो ! "

आपल्याभोंवती आपल्या दैनंदिन व्यवहार-आचारामध्यें-भावशून्य व बुद्धिभ्रष्ट उच्चनीचत्वाचा भेदभाव निर्माण करून, रूढीनें वाहवत जाणाऱ्या आपल्या अहंमन्य समाजानें जो अस्पृश्य वर्ग शतकानुशतकें मानला व गेल्या दीड तपांत 'हरिजन' या नव्या नांवानें गांधींनी ज्या उपेक्षित वर्गाच्या ( व एकूण समाजाच्याच ) आयुष्यांत, बघतां बघतां कायमची क्रांति घडवून आणली-त्याच वर्गाची प्रतिनिधि म्हणून '**भंगीण**' प्रथमच तुमच्यासमोर उभी राहील. सांवली अंगावर पडेल म्हणून पांढरपेशी मुलें तिच्यापासून लांब पळत असली नि तिचा कोणत्याही घराच्या पुढील बाजूशी संबंध नसला तरी तिच्या नशीबीं आलेल्या त्या रोजच्या घाणेरड्या कर्तव्यकर्माच्या रूपानें ती समाजाची एक अविरत महान् सेवाच करत असते. एकाची योग्यता अशी दुसऱ्यापेक्षां कशामुळें कमीजास्त होतें बरें जगांत ? तुम्हीच विचार करा--पण मग एक मात्र निश्चित-'नरेंच केला हीन किती नर !' अशा या निष्ठुर अस्पृश्यतेत बुडालेल्या एका संसाराची तरी लडकी ही गृहदेवता असते. व त्या दृष्टीनें त्या स्त्रीच्या मायेची धडपडहि आपणांस भोवतालच्या वातावरणांतील स्वार्थी क्षुद्रतेमुळें उठूनच दिसेल.

त्या पुढली '**कोळीण**' भागू ; ती धडधाकट 'ॲमेझॉन' च आहे, जगूं काय ! सर्वांना ती अगदीं सळो की पळो करीत असली व दुसऱ्यांना ती कालिकामूर्ती असली तरी आपल्या नवऱ्यापुढें या मायेच्या किमयेनेंच ती एक गोगलगाय बनते. त्यानंतरच्या '**माळणी**'च्या मातृहृदयाची धडपड

----गरीबीतहि तिच्या मनाची अपत्यासाठींची आकांक्षा ! निष्ठुर दैवदुर्विलासानें ती अखेर अपुरीच राहाते !--नवऱ्यानें पदरीं दोन पोरें टाकून अखेर तिलाच टाकून दिलेलें असलें, तरी '**गंगी पाटीवाली**' डगमगत नाही. श्रम करून स्वत:चें व आपल्या 'चालत्या बोलत्या आशां' चें--त्या मुलाचें --संरक्षण करत ती जगते. म्हणूनच त्यांचें प्रेम हें तिला व तिचें प्रेम हेंच त्या मुलांना मोठ्यांत मोठें औषध होतें.

मुलाभोंवतीं घोटाळणारा आईचा जीव व आईभोंवतीं घोटाळणारा मुलांचा जीव या दोन्ही भावनांचीं प्रतिबिंबें तुम्हाला '**निखळलेल्या चांदणी**'त व '**पाळण्याच्या दोरी**'त सांपडतील. त्या दोन शब्दचित्रांत दुर्दैवाच्या खेळानें आईचा बाळ व बाळाची आई एकमेकांना पारखीं झालेलीं आपल्याला दिसतात. नमऱ्या त्या करुणरम्यतेतहि आपल्याला ही मायेची किमयाच प्रतीत होईल.

आपल्या निष्प्रेम आयुष्यामुळें कंटाळून, खेडवळ '**तारा**' आत्महत्या करते व स्त्रीकडे पाहण्याच्या सामान्य माणसाच्या कठोर, स्वार्थी, कमअस्सल दृष्टीकोणावर एक विदारक प्रकाश पाडते. उलट, '**कालिंदी**' आपल्या जीवनाकडे सिंहावलोकनात्मक दृष्टीनें पाहून आपल्या नवीन जन्मलेल्या बाळकडे पाहात पाहात स्वत:शींच म्हणते 'तुझ्या नशीबीं नाही ना तोच इतिहास ?'

हा स्त्रियांकडे पाहण्याचा सर्वसामान्य अनुदार दृष्टिकोण निरनिराळीं स्वरूपें घेऊन समाजांत वावरतांना आढळतो. तो जेव्हां पालटेल, स्त्रियांना खरीखुरी कर्तृत्वशील स्वतंत्र आयुष्यं जगण्याची जेव्हां शक्यता होईल, तेव्हांच स्त्रियांच्या या 'मायेच्या किमये' नें मानवी समाजाचें व जगाचें खरें कल्याण होईल.

--पण मग, तो सुखद भावी काळ केव्हां लाभणार आपल्याला ?

## तंत्र—( पद्धति )

### १ भंगीण

१ ) लडकीचें बाह्यांग, तिचें घरीं येऊन पोचणें, तिचा गरिबीचा संसार व त्याभोंवतालचें वातावरण, लग्नघरची मेजवानी इ. चें वर्णन कसें केलें आहे याचा अभ्यास करा. सूक्ष्म निरीक्षणामुळें या प्रत्येक वर्णनाला कसा व कोठें उठाव मिळतो तें शोधून काढा.

२ ) 'ती सुद्धां माणूसच होती.' इथून केलेलें वर्णन नुसतें वाचतांनाहि आपण नाक मुरडूं. पण लडकी तर दररोज हजारदां हजार ठिकाणीं प्रत्यक्ष त्याच प्रसंगातून जात असते. अशा वर्णनांत, वाचतांना मनांत निर्माण होणारी जुगुप्सा ( शिशारी ) शेवटीं वाचकाच्या मनाला विचारशीलपणाकडे व श्रेष्ठ जाणीवेकडेच नेते. कदाचित् तुमचा मतभेद होईल; पण क्षुद्र वा वाईट विषयाच्या वर्णनाचा उपयोग हेतुपुरस्सर करून त्याची योजना चांगल्या विचार–भावभावना–निर्मितीसाठीं कशी करतां येईल याचें हें उत्तम उदाहरण आहे. हें सर्व वर्णन गाळून लडकीचें खरें दुःख कसें समजलें असतें ?

३ ) 'तिला बाईसाहेब—पुष्कळ,'—'जिवंत माणसाच्या—जिवंत असतेच,' 'लोकांचे संडास—जवळपासच होते' 'पैसा जास्त असला—उलट—मनुष्य दारुड्या होतो' 'स्वच्छतेलासुद्धां ऐपत—लागते' 'जगाची स्वच्छता—राहतां येत नाहीं' 'त्यामुळें तो—त्याला वाटत होतं.' 'जेवणां तली रुचि—अवलंबून असते,' 'हेच आमच्या—आहेत मुलीं !' 'कुत्रीं वगैरे—काय बरं अधिकार ?'—'दरम्यान, मोठ्यांच्या घरची—संपली होती' 'मानवी जीवनांतल्या कृत्रिम—कशी असणार बरं ?' 'पण वस्तुस्थिति—उलट होती' या वाक्यांची रचना व अर्थ त्या त्या वर्णनांतील संदर्भाच्या पार्श्वभूमीवर लक्षांत घ्या व आपल्या स्वतंत्र ग्रंथनांत त्या प्रकारची रचना-मांडणी करण्याचा प्रयत्न करा.

## २ कोळीण

१) ' सुखाची संध्याकाळ देण्यासाठींच सर्व दिवसाची धडपड !' हें कसें ? भागूचें सुख कोणतें ? दुसऱ्याच्या सुखांत दडलेलें तिचें सुख कोणतें ?

२ ) भागूच्या सौदा करण्याच्या पद्धतीचें वर्णन स्वतःच्या शब्दांत करा.

३ ) भाजीवाली, फुलवाली, बाटलीवाली, चरणीवाली यांचें प्रत्यक्ष निरीक्षण करून त्यांची छोटी छोटी शब्दचित्रें तयार करा.

## ३ माळीण

१ ) पांच टिकल्या, चहाचें पाणी, प्रेमासाठीं दुःख करायचे श्रीमंती चोचले, चिमुकल्याचें चिमुकलें स्वप्न, तिला जगवणारे तिचे पंचप्राण, दुःखाला पाहुणचार इ. शब्दरचना व उपयोग यांचा अभ्यास करा—

२ ) 'अग, आतांच तर भांडी घासून ना गेली ती ?' या प्रसंगांतून लेखकाला काय सुचवायचं आहे ? ' पण आश्चर्य वाटण्यासारखं काय होतं ?' कां बरं ? ' आणि त्याच वेळीं—अश्रूहि गळाले !' त्यावेळचे माळणीच्या मनांतले विचार तिच्या शब्दांत लिहा.

३ ) सुशिक्षित स्त्रियांनी अशिक्षित कामकरी स्त्रियांबरोबर कसें वागावें ?

## ४ पाटीवाली

१ ) ' लंगड्याला पांगळ्याचाच आधार असायचा जगांत–' यांतून काय सूचित होतें ? ' असल्या काटकसरीनेच आम्ही खूप असतो ' कसल्या ? कसे ?

२ ) ' दुसऱ्या दिवशीं सखू पुन्हां भेटते तेव्हां, '—' एकाएकी नवरा परत घरीं येतो तेव्हां'—अशा कल्पना करून त्या दोन प्रसंगांचीं शब्दचित्रें तयार करा.

## ५ निखळलेली चांदणी

१ ) चंद्राची कोर व ढग, निखळलेली चांदणी, या दोन सुरवातीच्या प्रसंगांचा उपयोग कसा करून घेतला आहे ?

२ )रमेशचा जन्म, ' एवढा तरी राहूं दे, ' वाढता रमेश व त्याचें

वर्णन, पालटलेला देखावा–हे या चित्राचे टप्पे आहेत. त्यांची रचना व मांडणी कशी केली आहे त्याचा अभ्यास करा.

३ ) पडणाऱ्या ताऱ्याला वनिता अखेर अखेर जें सांगते त्यांतून काय सूचित होतें ? ' आईचें दुःख ' व ' आईचें सुख ' या विषयावर प्रत्येकी १०।१५ ओळींचे आकर्षक परिच्छेद लिहा.

## ६ पाळण्याची दोरी—

१ ) ' तिच्याशीं तेव्हांपासूनच मी लपंडाव खेळतोय् ' ' त्यांनीं डोळे कां पुसले तें त्या वेळीं मला जरा देखील समजलें नाही ' ' अज्ञानात अतिशय आनंद असतो ! ' ' त्याच्या कृतींना जगांत कोण धन्य म्हणणार ? ' इत्यादि वाक्यांतील करूणरम्यता ध्यानांत घ्या.

२ ) कल्पना विस्तार करा— ' आईची आठवण–किंमत !– ती नसतनाच ती खरी समजते !– आई असलेल्यांना, किंवा ती असून नसल्या-सारखं वागणाऱ्यांना, तें काय सांगणार–? '

## ७ तुटलेली तारका–

१ ) या शब्दचित्रांत जें कथानक आहे तें प्रसंग घडले त्या अनुक्रमानें प्रथम वाचनानंतर लिहून काढा. आणि मग वाचतांना ते कोणत्या क्रमानें आपल्याला समजत जातात तें पुन्हां पहा—

तारा उडी घ्यायला निघाली आहे हें ती विहिरीजवळ आल्यावर समजतें. ती उडी कां घेणार आहे हें ती अगदीं उडी टाकण्यापूर्वीच ( मागें भूतकाळांत जाऊन ) सांगितलें आहे.

पहिल्या दोन पानांत तर तारा आपल्याला कोठेंच आढळत नाही. सूर्य, सूर्यास्त, तारका, ढग, वारा, गदगदणारीं झाडें, पावसाचे थेंब, गढूळ पाणी इ० निसर्गाचेंच त्यांत वर्णन आहे. अखेर सुरवात होते ती–' ताराहि रडत होती–घरामागच्या तुळशीवृंदावनापाशीं—' इथून. असें कां ? या सुरवातीचा व प्रसंगकथनाच्या या अनुक्रमाचा हेतू काय ?

अशा कथन-पद्धतीला **नाट्यात्मक** ' म्हणतात. मध्येंच सुरवात करून मग जरुर तसे मागील पुढील प्रसंग जोडल्यानें उत्सुकता वाढवून आपल्याला हवें त्याप्रकारें वाचकाला पुढें नेतां येते. माणसाच्या मनाप्रमाणें निसर्गाला वेष देणें, त्यावर मानवी भावनांचा आरोप करणें; याला क्षणभर '**मानवीकरण**' म्हणूं या. या प्रकारचे मासले या चित्रांतून निवडून त्यांचा अभ्यास करा.

२ ) 'ज्याची भाषा त्यालाच समजते !–हृदयं सारख्या दर्जाचीं असावीं लागतात दिलजमाईला'—'तिला समोरच्या पाण्यामध्येंहि काळोखाचं प्रतिबिंबच दिसत होतं !' 'नातीं बदलल्यावर वागणुकींतहि फरक झाल्यावाचून राहात नाही' 'दुष्ट मनात दुष्ट विचार शिरायला व रुजायला वेळ लागत नाही.' 'दगडाने तारेला बरीच मदत केली.' 'अहाहा !—माणसापेक्षा बैलाच्या पाठीवरुन आपलं शरीर नेलं !—' 'तारेच्या अस्थि स्वतः तीर्थक्षेत्रावर नेण्याचं पुण्य अण्णा व त्याची आई यांना मिळालं.'

या वाक्यांतून जातां जातां अन्य व अ प्रत्यक्ष अर्थाच्याच लाटा वाचकांच्या मनांत उठवण्याची लेखकाची योजना आहे ती काळजीपूर्वक अभ्यासा. सामाजिक अन्यायांवरचे कोरडे असे अप्रत्यक्षपणेंच ओढलेले असतात.

## ८ तोच इतिहास ?

१ ) आपल्या वर्ण्य विषयाच्या ओघांत सामाजिक अन्याय व दांभिकपणा व्यापक पद्धतीनें उघड्यावर टांगण्याचाही लेखकाचा प्रयत्न चाललेला असतो—उदहरणार्थ —'तोपर्यंत तरी देवांची व भिकाऱ्यांची ब्याद —' 'नायकांचा जल्म--अखेरहि एकदां मरायचं—' 'विधवाहि आंतून पाहात होत्या' 'या कामीं लांकडी ठकी—मदत होई.' 'मग पांचपन्नास---लगीन झालं एकदाचं.'

२ ) पुढील वाक्यांनी वर्णनाचा हुबेहूबपणा व सूक्ष्मता कशी वाढली आहे तें लक्षांत घेऊन तशी रचना करायला शिका—

'नाहीतर स्वतः गहाण—पाळी' 'तिच्या दृष्टीने—पालटत होतं'

'जगाचा दांभिकपणा—येतो अंगांत' 'कालिंदीच्या—चालवीत होतं' 'तिला वाटलं—आपली लाज राखील' 'लाजेने तिला—तोंड गुडघ्यांत लपवलं' 'पण ती—चढवून आणला होता' 'ते चहा चिवडा—लागले कालिंदीकडून' 'स्वतःची जबाबदारी—कल्पना असते' 'तरी पण कालिंदीला—ऐकूं येत होता'; 'आणि मग—पुढला पल्ला गांठला' 'सामाजिक बंधनाची—पाय मागे ओढी'

३ ) कालिंदी दुबळी कां होत गेली! 'स्त्री जीवनांतील सुखदुःखें' यावर एक १५।२० ओळींचा परिच्छेद लिहा.

## ९ घरोघरच्या देवी—

१ ) कल्पना विस्तार करा–' भांड्याला भांडें आपटतंच' 'भविष्याच्या उदरांत स्त्रीच्या आशेचे अंधुक किरण दिसतात' " स्वयंकेंद्रित पुरुषी अरेरावी म्हणजेच स्त्रीच्या जीवनातील संसारछत्र.'

२ ) स्त्रियांना घरोघरच्या देवी म्हणण्यांत कोणतें स्वारस्य आहे? त्यांच्या विविध मायेची किमया (या पुस्तकातील वाचनाचा आधार घेऊन) स्वतःच्या शब्दांत मांडा.

३ )'**मायेची किमया**' या पुस्तकाचें तंत्र, मंत्र व पार्श्वभूमी या दृष्टीनें सविस्तर व सोदाहरण परीक्षण करा.

# पार्श्वभूमि—तंत्र ( पद्धति )

( लेखकाचें हितगुज )

स्त्रीजीवनाबद्दलचीं हीं सर्व चित्रें निरनिराळयावेळीं निरनिराळ्या तात्कालिक प्रबळ भावनांतून व मनावर प्रत्यक्ष झालेल्या परिणामांतून मिळालेल्या लेखन–स्फूर्तीनेंच हातून उतरलीं आहेत. इतर हजारों कारणें असलीं तरी लढाईला जसें कांहींतरी तात्कालिक कारण घडावें लागतें, तसेंच लेखनाचेंहि असतें. विशिष्ट विषयाबद्दल व सामाजिक प्रश्नाबद्दल लेखकाची विशिष्ट मतें, विशिष्ट दृष्टिकोन असतोच. पण त्याला लेखन–कलाकृतींत वाचा फुटायला तात्कालिक उत्कट भावना–विचार निमार्ण करणारे जोरदार प्रसंग–घटना आपोआप घडत असतात व तसल्या प्रसंगानुभवांच्या परिणामांतूनच कलाकृती मूर्त स्वरूप धारण करतात. एवढ्याचसाठीं नवोदित लेखक डोळस असला पाहिजे.

स्वतःच्या मातृविहीनतेच्या तीव्र रुखरुखीतूनच वयाच्या पंधरा सोळाव्या वर्षी '**पाळण्याची दोरी**' लेखकाच्या हातून उतरली. अर्थात् त्यावर मग वेळोवेळीं हात फिरलाच. एका संबंधीयाच्या गोड बाळाच्या अकस्मात् मृत्यूतून त्याच वेळीं '**निखळलेली चांदणी**' अवतरली. सत्यसृष्टींतील एका दुःखद आत्महत्येनें व्याकुळ होऊन '**तुटलेली तारका**' शब्दरूपांत अवतरली. त्या लेखनाच्या वेळीं लेखनशैलीचे अनेक जाणते प्रयोग हेतुपुरस्सर केले, पण सहजासहजीं तयार झालेल्या '**अश्रूंच्या जोडी**' इतकें या प्रयासपूर्ण लिहिलेल्या '**तुटलेल्या तारके**' ला यश व प्रसिद्धी मिळणें शक्य झालें नाहीं. साहजिकच आहे. कांहीं कलाकृती सहजासहजींच उत्तम मूर्त स्वरूप धारण करतात.

शेजारींपाजारीं मोलमजुरी करणाऱ्या खऱ्या माळणीवर आलेल्या खऱ्या दुःखी प्रसंगांतूनच ही '**माळीण**' अवतरली. अनेकदां बाजारखरेदीची पाटी घरापर्यंत आणणाऱ्या एका पाटीवालीबरोबरच्या येतांयेतांच्या गप्पांमधूनच '**पाटीवाली गंगा**' या शब्दचित्राला चालना मिळाली. '**प्रगति**' साप्ताहि-

कांत '**भंगीण**' प्रसिद्ध झाली तेव्हां प्रथम त्या चमत्कारिक विषयाबद्दल व त्यांतील कांही वर्णनाबद्दल ( त्यावेळच्या इतर वाङ्मयांतील सामान्यतः सांपडणाऱ्या रोमहर्षक वर्णन-वातावरणाहून दिसणारें विभिन्नत्व व कांहीसें विभित्सत्व त्यांत आढळल्यामुळें व तें डोळ्यांत खुपल्यामुळें ) कित्येक प्रतिष्ठितांनीहि तोंडी लेखी नाकें मुरडलीं. पण मग '**कोळणी**' सकटच्या त्या चारी शद्वचित्रांतील दलितवर्गीय दुःखाबद्दलच्या अप्रत्यक्ष सहानुभूतीचा मध्यवर्ती दृष्टीकोण कित्येक रसिकांनी पुढें उचलूनहि धरला. वाङ्मय-कलाकृति नेहमी हेतूपूर्ण असावी या मताला या अनुभवानें दुजोराच नाही कां मिळत ? वाङ्मय प्रत्यक्ष सामाजिक क्रांति करतेंच असें नाहीं. पण सहानुभूतीची रसिक मनांतील निर्मिती व नव्या दृष्टिकोनाला दिली जाणारी अप्रत्यक्ष कलाटणी या गोष्टी लेखकाच्या खासच हातीं असतात. व त्यांचाहि समाजाच्या प्रगतीला उपयोग होत असतो. हीच दृष्टी '**तोच इतिहास ?**' व '**घरोघरच्या देवी**' या पांढरपेशा स्त्रीच्या जीवनावरील शेवटच्या दोन शद्वचित्रांत तुम्हाला आढळेल. त्यापैकीं '**घरोघरच्या देवी**' हें शद्वचित्र लेखकाच्या त्याच नांवाच्या नाट्यात्मक कादंबरीला प्रस्तावात्मक जोडलेलें आहे; तेथूनच तें उचललें आहे. याच दृष्टीनें फावल्या वेळांत प्रस्तुत लेखकाच्या '**जीवनगंगा**' या कादंबरींतील '**प्रेमा**' या सुशिक्षित डॉक्टरीण नायिकेच्या व '**उपकारी माणसें**' या प्रदीर्घ कादंबरींतील '**कमळामावशी**' या संसारी स्त्रीच्या जीवनाचीहि जास्त ओळख करून घ्या.

**[ हृदयांतलीं शद्वचित्रें १-( भाव जीवन ) व -२ शहरचे भाई या पुस्तकांमधील मंत्र-तंत्रात्मक टिपणें जरूर दृष्टि खालून घाला व फावल्या वेळांत तीं शद्वचित्रेंहि वाचून काढा ]**

---o---

हृदयांतलीं शब्दचित्रं-२

# मायेची किमया

[१] भंगीण..............(लडकी)
[१५-५-३१]

[२] कोळीण...............(भागू)
[९-२९]

[३] माळीण.................(मैना)
[५-६-३१]

[४] पाटीवाली.............(गंगा)
[९-२९]


[५] निखळलेली चांदणी....(माईचा रमेश)
[२०-१२-३०]

[६] पाळण्याची दोरी.....(वात्सल्य)
[२४-१२-२४]

[७] तुटलेली तारका........(तारा)
[८-३०]

[८] तोच इतिहास !.....(कालिंदी)
[११-३१]

[९] घरोघरच्या देवी......(स्त्रिया)



[ १ ]

# —लडकी—

## —१—

सावली अंगावर पडेल म्हणून मुलं लांब पळत होतीं !

...पण तिचं तिकडं लक्षच नव्हतं !

डोक्यावर माखलेला डबा; हातांत वापरुन वापरुन झिजलेला खराटा !— दुसऱ्या हातानें कागदाच्या दुर्डीत कांठ धरुन ती डबा सांवरीत होती. तिचे एकंदर कपडे मलीनच ! लांबरुंद घेराचा मळकट घागरा आंवरुन वर घेतलेला; वर पिवळा-तांबडा अशा कांहींशा रंगाच्या कापडाचा तुकडा कंबरेजवळ अडकवून नंतर वर घेऊन, तिनें त्याचा पदरासारखा उपयोग केला होता ! घागऱ्याला एका बाजूस मळकासा रुमाल खोंचला होता !

तशी ती बरी काळीसांवळी होती !...पण काळजीपूर्वक निगा न राखल्या-मुळें तिचा चेहरा... होता त्यापेक्षां जास्त काळा दिसत होता. त्यांत पोटाच्या काळजीनेंहि एकप्रकारें भर घातली होती ! डोक्याला कुंकूं नव्हतं ! नाकांत कसलीशी तांबड्या खड्याची चमकी होती ! काळ्यांत तांबडं तें कितीसं उठून दिसणार ? कानांत चांदीचे अवजड दागिने लोंबत होते. खराटा धरलेल्या उघड्या हातावर कसलीशी आकृति गोंदून घेतलेली दिसत होती. मनगटावर हस्तिदंती बांगड्या रुळत होत्या ! पायांत चांदीचीं वळीं नि घोट्याजवळ चांदीचे तोडे....

ती झपझप पावलं टाकीत होती. कोणच्याही घराच्या पुढील बाजूशीं तिचा संबंधच नव्हता. मागील बाजूस जाऊन आपलं काम झालं, कीं ती पुढच्या घराचा रस्ता धरी !

—२—

आतां या आळींतील ह्या शेवटच्या घरामागें जायचं, कीं तिचं सकाळचं काम संपलं! ..पुढला बंगला तसाच टाकून ती मागच्या बाजूस गेली. वईतून, केराकचऱ्यांतून;...तिच्यासाठीं केलेल्या वांकड्या तिकड्या मार्गानें जातांना तिनें डबा सांवरला. डोक्यावरील डबा खालीं उतरून तिनें डांबर लावलेलं छोटं दार उघडलं!

तीसुद्धां माणूसच!—तिनें एक क्षणभर नाक मुरडलं! पण करणार काय? त्याच घाणेरड्या कामासाठीं तिचा जन्म!...नि तसाच जायचा...

तिनें नाकावरील हात काढून, आपल्या पदरांतून एक कागद हातांत घेतला. घाण येतच होती...माशा घोंघावत होत्या...वरून पाणीही...

कागदाच्या साहाय्यानें तिनें टोपलीला हात घातला!

'ईस्वर तेरा दिल दिखनाऽरा' असं कोणतंसं गाणं गुणगुणत तिनें आपल्या भागधेयास सुरवात केली.. दोन्ही तिन्ही टोपल्या साफ करून पुन्हा जागच्या जागीं ठेवल्यावर तिनें दार बंद केलं...डबा संभाळून आपल्या उत्तमभागीं चुंबळीवर ठेवला...दुसऱ्या हातांत खराटा घेऊन, ती आतां घरीं जावयास मिळेल या आनंदानें लवकर लवकर चालूं लागली!...

—३—

"एऽ बयाऽ!" तेथील लफ्फेबाज लुगड्यांतल्या बाईसाहेब कडाडल्या.

तिला या एकाच प्रकाराचा प्रत्येक ठिकाणीं अनुभव येत असे! तिला बाईसाहेब न् दादासाहेब पुष्कळ!!

"काय गऽए! बरीच कीं ग माजोरी झालीस! हल्लीं बरोबर साफ करीत नाहींसच संडास! आणि आंत इकडे कोण झाडू मारणार? तूं का मी? न् तो तिथं बाबू बसलाय् तें कोणी काढायचं?.....तें कांहीं नाहीं; तुझ्याविरुद्ध मुनूसीपाल्टींत तक्रारच केली पाहिजे........."

इथंच नाहीं; सगळीकडेच तिला असं सारं ऐकून घ्यावं लागे!

एखाद्याच ठिकाणीं ठरल्या कामात कसूर करण्यांत तिचा मोठासा फायदा तो काय होणार होता? घाणेरडं काम खरं; पण तें एकदां करावयाचं ठरविल्यावर, थोडं कमी न् थोडं जास्त करून काय मोठासा फरक व्हायचा?

परंतु तिच्या दृष्टीनें कोण पहाणार इतकं?...जो तो स्वतःच्याच तोऱ्यांत! हीं कोणीं माणसंच नव्हत अशीच त्यांची कल्पना!

तिलाहि हें सर्व कळत होतं; म्हणूनच तिनें बाईसाहेबांनीं केलेल्या सर्व सूचना,...थोडंसं कुरकुरत कां होईना,...पार पाडल्या!

मुकादमाचीही थोडीशी भीति वाटल्यावांचून राहिली नाहीं तिला! शिवाय बाईसाहेबांकडून पुढं मागं पोस्त मिळेल ही आशा तिनें मनाशीं कां बरं बाळगूं नये? जिवंत माणसाच्या मनांत आशाहि जिवंत असतेच!

–४–

सारं झाल्यावर, तिनें ठरल्या जागीं जाऊन डबा मोकळा केला.

ती घराची वाट चालूं लागली!...दिवसांताल आनंदाची घटका जवळ येत होती!...तिचीं मलीन अंगाचीं, नागडींउघडीं पोरं तिच्या डोळ्यांसमोर नाचूं लागलीं, चालतां चालतां!...

ती झपूझप् पावलं टाकीत होती; तिचा जीव उत्सुकला होता!

चांगल्या आळ्या गेल्या; नि अखेर भंगी-आळी आली!...

थोडक्या वेळांत जाण्यासाठीं, जवळचा रस्ता म्हणून या रस्त्याचा लोक ज्या ज्या वेळीं उपयोग करीत, त्या त्यावेळीं ते जिवावर उदार होऊन, 'प्राणायाम' करीत; नाकपुड्या दाबून जात. केव्हां बाहेर पडतों त्या भागांतून, असं अगदीं त्यांना होऊन जाई.

पण ही जसजशी आंत जाऊं लागली, तसतसा तिचा आनंद वाढूंच लागला!...साहजिकच होतं;...तिचं सर्वस्वच त्या भागांत दडलेलं!...

सर्व गांवांतून गोळा करुन आणलेल्या केरकचऱ्याच्या ढिगाऱ्यांत गाढवं लोळत होतीं!...त्यांच्यांतच तिथलीं मुलं खेळत होतीं!! कामाच्या मानानें खावयास न घातल्यामुळें तीं बिचारीं गाढवं......मिळतील त्या गवताच्या काड्या त्या केराच्या ढिगांतून शोधून काढीत होतीं!...कसल्या तरी आशेनें तीं मुलंहि त्या केरांत हात घालून कांहीं शोधत होतीं.

बिचारीं निष्पाप बालकं!

प्रत्येकाची किंमत सारखी कां नसावी? एकाची योग्यता दुसऱ्यापेक्षा कशामुळें जास्त होते बरं, जगांत?

अरेरे! 'नरेंच केला हीन किती नर—'

-५-

केर उपसून रिकाम्या केलेल्या गाड्या तिथेंच होत्या! संडासामागील टाक्यांचं पाणी उपसून आणणाऱ्या टाक्या तिथंच होत्या! वापरावयाचे डबेही तिथंच होते!...घाणीचीं गटारं त्याजवळूनच वहात जात होतीं!... लोकांचे संडास झाडणाऱ्या या दुर्दैवी माणसांचे स्वतःचे संडासहि रांकेनें त्या जवळपासच होते!...

आणि त्यांनजीकच त्यांचीं तीं दरिद्री रहातीं घरं-खोपटीं—होतीं!

तीं खोपटीं वरखालीं सर्व बाजूनें पत्र्याचीं केलेलीं होतीं!...पत्रे गंजलेल्या डब्यांचे ठोकून चपटे केले होते;...नि त्यांचाच छपरांसाठीं व भिंतीसाठीं उपयोग केला होता!...फळकटं गोळा करून दारं (दोनच,-एक मागील, एक पुढील-) तयार केलीं होतीं!...

दारांत खाटा पडल्या होत्या. खाटांवर मलीन चिरगुटं होतीं. दोन तीन पांघरुणं अस्ताव्यस्त पडलीं होतीं!...रस्त्याच्या सपाटीलाच खोपटाची जमीन धुळीनें बरबटून निजली होती!...

तिनें डोक्यावरील डबा व खराटा बाजूस ठेवला !...ती घरीं...आपल्या हक्काच्या घरीं...परतली होती!; हो, त्या घराची तरी ती गृहदेवता होती.

—६—

नवरा नुकताच परत आला होता. पावसाळा जवळ येऊं लागला असल्या-मुळें तो घराचे पत्रे ठाकठोक करून नीट करीत होता !...

त्याला तसं काम करीत असतांना पाहून तिला प्रेमाचं भरतं आलं !... आपल्या नवऱ्याबद्दल तिला किती अभिमान वाटे !...तो थोडा दारुड्या होता;...म्हणून तिला त्याचा राग येई; पण त्याला तिचा इलाज नव्हता !... तसाच त्याचाही नव्हता म्हटलं तरी चालेल !...

पैसा जास्त असला म्हणजे ‘ कसा खर्च करूं ? ’ या चिंतेनें मनुष्य दारुड्या होतो; उलट, पैसाच नसला म्हणजे त्या चिंतेनेंहि मनुष्य दारुड्या होतो !

जग किती विविध आहे !...

ती त्याच्याकडे पाहून प्रेमानें तोंडभर हंसली ! त्यानेंही हंसून आपल्या कामास पुढं सुरवात केली.

ती पुढं येतांच दाराशींच खांबाला बांधलेली बकरी बें बें करून तिला ओळखल्याचं दाखवूं लागली ! तिनें तिला प्रेमानें थोपटलं.

तिनें झोळींत वांकून पाहिलं;—तिचं लहानगं नुकतंच चुळबुळ करूं लागलं होतं ! त्या काळ्या मचकट कापडाच्या झोळींतून तिनें त्याला वर उचलून त्याचे मटामट मुके घेतले !...

कोपऱ्यांतील मातीचीं मडकीं, रांजण-हांडे पाण्यासाठीं तिची केव्हांपासूनची चातकासारखी वाट पहात होते. रस्त्यावरच्या सार्वजनिक नळावर तिला हंडा घेऊन नंबर लावायचा होता.

-७-

नवऱ्याला पाणी तापवून दिल्यावर तिनें स्वतःही अंघोळ केली !...स्वच्छ-( तिच्या मानानें )-कपडे घालून तिनें अन्न शिजत घातलं. स्वच्छतेला सुद्धां ऐपत नि परिस्थिति लागते !...जगाची स्वच्छता ठेवण्याचं काम अव्याहत करणाऱ्यांना त्याहून जास्त स्वच्छ रहातां येत नसतं.

केरांत खेळत असलेलीं मुलं दुडदुडां धांवत आलीं.

एकाला खुळखुळा सांपडला होता; त्यामुळें तो त्या दिवसाचा राजा असल्यासारखं त्याला वाटत होतं. आपल्या इतर भावंडांपेक्षां आपण कांहीं तरी जास्त आहोंत असं वाटून तो त्यांना हिणवीत होता !...

मनुष्यस्वभावच आहे तो;...सगळीकडे तसंच असतं ! !...

तिला मात्र वाईट वाटलं ! मुलांना खेळायला द्यायला खर्चायचं तिच्या पगाराच्या आटोक्याबाहेर होतं !...कधीं मधीं पोस्त मिळे त्याच वेळीं असल्या मुलांच्या हौशेच्या गोष्टींची खरेदी !...

तिनें उद्यां सणाचं पोस्त मागावयाचं ठरवलं !...

मुलांना अंघोळी घातल्यावर तीं सर्व मिळून जेवलीं ! या आनंदाच्या घटके-साठींच तिची व तिच्या नवऱ्याची साऱ्या दिवसांची नाक मुठींत धरून होणारी ती धडपड ! !...

गरिबीचं जेवण !...तें कितीसं रुचकर असणार ?...

पण रुचकर केलेलं नसलं म्हणजे तें रुचकर लागतच नाहीं असं थोडंच आहे ?...उलट कधीं कधीं रुचकर अन्नही कोणाकोणाला रुचकर लागत नाहीं ! !...जेवणातली रुचि मनावरच अधिक अवलंबून असते.

-८-

आज त्या लगीनघरचा थाट पाहून तिला मेजवानीच्या वेळीं जेवायला मागण्याची सहज इच्छा झाली !

" बाईऽ ! भंगिणीला वाढा हो ! ! " ती एका कोपऱ्यांत बसून केव्हांची ओरडत होती. पण कोणीच तिची दाद घेत नव्हतं !

ती दोन तीन तासांपूर्वी आली होती; पण त्यावेळीं कोणी तिला हांकलायला खेकसलं—" आतां या बाईच्या वेळींच काय ग तुझी कटकट ? जा; अजून आमचीं जेवणं व्हावयाचीं आहेत. चल...निघ– "

आशा असते ना माणसाला !...' एक दिवस तरी आपलीं पोरंबाळं खातील गोड धोड !! मग नेहमींचं आहेच आपलं कदान्न !!'

ती घरीं जाऊन, परत दोनतीन तासांनीं टोपली घेऊन आली होती ! पण तिच्या ओरडीकडे लक्ष कोण देतो !

लग्नघरच तें; आणि पुन्हां श्रीमंतांचं ! नुसता बोवाळ नि बडेजाव ! पोकळ डौलाचं माहेरघरच तें !!

" दादासाहेब, भंगिणीला पान वाढा हो!" ती पुन्हां पुन्हां ओरडे.

लोक येत जात;...हंशांचे आवाज येत;...फोनोपेटीचा धुमाकूळ चाललाच होता !...तिथल्या त्या गोंधळांत हिची दाद कोण घेणार !

तिला कालच्या एका प्रसंगाची पुन्हा आठवण झाली.

जवळच्याच घरीं सणाचं दोन आणे पोस्त मागीतलं; तेव्हां त्या 'बाई' नें व ' दादासाहेबां 'नीं, तिला न समजणाऱ्या अर्थशास्त्रावरील व्याख्यानाचा इतका डोस पाजला,.. कीं, स्वतःचं काम चोख करण्याचा पुढला उपदेश ऐकावयास ती तिथं उभीच राहिली नाहीं !

पोटासाठीं दीन झालेल्यांपुढेच यांचं पांडित्य ! त्याच वेळीं यांची कांटकसर उसळावयाची ! नाहीं तर हवी तशी उधळपट्टी !!

हो ! हेच आमच्या उच्च जातीच्या सुशिक्षितांचे गुणधर्म आहेत मुळीं !!...

–९–

ती पुनः पुन्हां ओरडत होती ! पण त्या बोवाळांत तिच्याकडे कोणाचंच लक्ष

जात नव्हतं ! ती मात्र सकाळपासून जेवणाच्या आशेवर उपाशी होती !

घरचे पट्टेवाले कुत्रे, तिच्यादेखत लाडूजिलब्या खातांना दिसत होते !

ती बिचारी मधून मधून सुग्रास अन्नासाठीं व आपल्या घरच्या मुलांच्या मायेमुळें, मोठमोठ्यानें ओरडत होती– "बाईऽऽ, दादाऽऽ, भंगिणीचं पान !"

कुत्रीं वगैरे (' पशू ' म्हणूनच) माणसांपेक्षां कमी प्रतीचे असं लेखण्याचा तरी आपल्याला काय बरं अधिकार ?

निष्ठूर व डोळे फोडणारी असली नीच विषमता ! जडजीवनप्रधान ध्येयं !...माणसाची स्वतःच्या पोटासाठीं चाललेली धडपड !! सर्वच सारखं चाललेलं दिसून येतं !...नाहीं कां ?

मग ' समाजप्रिय उत्क्रान्त प्राणी ' अशी स्वतःची घमेंडपूर्ण व्याख्या आपण कशाच्या जोरावर व कां करावी ?– क्षुद्र माणसानें आपल्यासाठींच काढलेलं आपलंच चित्र तें !!

पुष्कळ वेळानें अखेर एक जण बाहेर आला !

"काय आहे ग ओरड उगाच ? तुला आधीं यायला काय झालं होतं ? आमचीं जेवणं तर केव्हांच होऊन गेलीं ! वाटेल त्या वेळी कसं मिळेल ? काय खानावळ मांडलीय् ?—नीघ. उगाच नको इथं कटकट चल्..जा!..."

मघां आली त्यावेळीं बराच वेळ होता जेवणं व्हायला !

आतां जेवण होऊन बराच वेळ होऊन गेला होता ! !

दरम्यान, मोठ्यांच्या घरची, मोठ्यांसाठीं, ( –आपला पोकळ बडेजाव आपल्या सारख्याच पोकळ 'मोठ्यां'त कायम राहण्यासाठीं–) अन्नाची नासधूस होईपर्यंत, आग्रहानें वाढवाढून मेजवानी-बडी मेजवानी-संपली होती !! —मानवी जीवनांतल्या कृत्रिम थरांची हालचाल याहून निराळी कशी असणार बरं ?—

## –१०–

भंगीण आली !... भंगीण गेली ! !...

'मोठ्यां'कडची मेजवानी, खावयास कंटाळलेल्या 'मोठ्यां' साठींच असते हें बिचारीला ठाऊक नव्हतं !!

तिनें, कुत्र्यांनीं खाल्लेल्या ठिकाणीं पाहिलं ! खरकटं टाकलेल्या जागे-कडे नजर फेंकली ! सुशोभित केलेला मांडव वरपासून खालपर्यंत पाहिला !

रिकामी टोपली डोक्यावर टाकून, हातांतहि दोन तीन रिकामींच भांडीं घेऊन, ती आली तशीच रिकाम्या हातीं पण भरल्या हृदयीं परत आपल्या घरीं फिरली ! तिच्या रास्त आकांक्षा–भावना नकळत धुळीला मिळाल्या होत्या.

परततांना तिच्या डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह अविरत चालला होता !

[लोकांच्या दृष्टीनें ती चांगल्या वस्तींतून भंगी–आळींत,—घाणेरड्या वस्तींत—परत जात होती ! पण वस्तुस्थिती मात्र त्याच्या अगदीं उलट होती!]




[२]

# भागू कोळीण—

—१—

सूर्य 'असा' वर येईपर्यंत भागूचं सकाळचं अर्धअधिक काम संपत आलं होतं. ती 'दीस' उगवायच्या किती तरी आधीं उठून समुद्रावर गेल्यामुळें आपल्या मुलीच्या—मरीच्या—साहाय्यानें तिनें आतांपर्यंत दहा बारा रांपणी 'ओढल्या' असल्यास नवल नव्हे.

"मरेऽ, पोरे, आटप! ऐशी कैशीऽग तूंऽऽ!! घाल तो म्हावरा टोपलींत!"—जाळ्यांतील मासे दोन खांद्यावर पाठीमागें अडकविलेल्या मडक्यांत टाकीत सर्वसाधारण कोळणीच्या आवाजानें हेल काढीत ती म्हणाली.

समुद्राच्या लाटा येत जात होत्या. आधींच गुडघ्यापर्यंत असलेलं लुगडंसुद्धां मधून मधून येणाऱ्या मोठ्या लाटांनीं ओलंचिंब झालं होतं. जाळं ओढतांना चोळीचे हात व लुगड्याचा खांद्यावरील भाग भिजून थबथबत होता. वाऱ्यामुळें मधून मधून त्या मायलेकींना कुडकुडल्यासारखं वाटे.

त्यांनीं आपलं काम पुढं चालविलं. आणखी पांच सहा जाळीं टाकल्यावर त्यांच्या दोन्ही टोपल्या भरल्या. आज 'उदान' असल्यामुळें समुद्राला म्हावरा बरा जमला होता. जाळं पाण्यांतून काढून दोघीही बाहेर आल्या.

"पोरेऽ, पाय उचल!" भागू मासळीची टोपली मरेच्या डोकीवर ठेऊन तिला म्हणाली. आपल्या डोक्यावर तिनें दुसरी टोपली ठेवली. टोपलीखालच्या लांकडी पाटावर जाळं टाकून तीही धांवण्याचजा दबदबत चालूं लागली.

—२—

वाटेंतच तिचं खोपट होतं. त्यांत तिनें जाळं टाकलं.

" बाब्या, भाकर भुजली हाय;...न बोंबील बी हायत भुजलेलं !"

तिला जास्त वेळ नव्हता. एक हात टोपलीवर ठेऊन ती पुन्हां दबदबां धांवूं लागली.

भागूच्या पायाच्या पोटऱ्या नेहमीच्या धांवण्यानें पिळदार दिसत होत्या. तिची एकंदर शरीरयष्टीच काटक ! चेहरा रांकट, मोठाला कुंकवाचा टिळा ! कानांतील वाटोळया नि जाड मुद्या तिच्या एकंदर रांकट नजरेंत कांहींसा भयानकपणाच आणत होत्या.

डोक्यावरील टोपलीचं वजन ती मधून मधून दोन हातांवर तोलून धरून चालतां चालतां डोक्याला विसांवा देत असे. मधेंच ती हळूहळू चालूं लागे. परंतु बहुतेक दौड करीतच जात होती.

कावळयानें पाटीवर झडप घालूं नये म्हणून ती मधून मधून आपला हात टोपलीच्या मध्यभागीं 'हाः' 'शूऽऽः' 'भिऽल्या' म्हणत फिरवीत होती. तरी एखादा कावळा एकदम झडप टाकून एखादा मासा नेत असेच.

धांवण्यामुळें तिला श्रम होत नसत असं नव्हे. मधून मधून ती कपाळा-वरील घाम डाव्या हाताच्या पहिल्या बोटानें उडवून टाकीत असे.

धांवून दमली कीं हळूहळू चालूं लागे; पण लागलीच तिला उशीर झाल्याची आठवण होई व तात्काळ ती धांवूं लागे.

स्त्री जातीचा स्वाभाविक विनयशीलपणा तिच्या कर्तव्यवैशिष्ट्यामुळें बराच लोपला होता. आपल्या कृतींनी ती पुरुषांशीं समान हक्क गाजवीत होती.

—३—

मासळीबाजारांत ती आपल्या नेहमींच्या जागेच्या जवळपास जाऊन

बसली. झांकण काढलेल्या फळीवर तिनें म्हावऱ्याचे वांटे काढले.

गिऱ्हाइकाची तिला इतकी फिकिर नव्हती. पटल्यास सौदा होई; नाहींतर ती इतकी काळजी करीत नसे. प्रथम संभाळून, नंतर न पटल्यास अपमानगर्भ भाषेनें, नि शेवटीं सौदा न पटल्यामुळें...उघड उघड "इयाऽवाला आला म्येला इ्याऽवालाऽ" असें मोठ्यानें म्हणत गिऱ्हाइकांच्या तोंडाभोंवतीं हात ओवाळण्यांसही ती कमी करीत नसे.

तिची एकंदर शरीराची काठी व बेफिकिर वागण्याची पद्धत पाहून साधारणतः लोक तिला किंमत विचारायलाच घाबरत असत. आणि एकदा तिला विचारण्याचं कोणी धाडस केलं, कीं, तिच्या जातेवेळच्या शिव्या चुकवण्यासाठीं तिच्या म्हणण्याप्रमाणें सौदा पटवूनच तो मनुष्य तिच्या समोरून निघून जात असे.

यामुळें तिची विक्री जरा मंदमंद पण चांगली होई.

—४—

सगळी मासळी संपली, कीं, ती रोजचा कमजास्त मीठमीरची बाजार करून पोरीला घेऊन घरीं परते. घरीं गेल्यावर ती नवी भाकर व नवं कोरड्यास करी. जातेवेळीं नवऱ्यासाठीं व मुलासाठीं ती जेवण तयार करून जातच असे.

तिला बापडीला लिहितां वाचतां तें काय येणार ? पण लोकांचीं मुलं शिकलेलीं पाहून आपला बाब्याही शिकावा असं तिला वाटे. तिनें जवळच्याच मास्तरांच्या पायां पडून बाबूला शाळेंत घातला होता. मधून मधून त्याच्या अंगांत पिशाच्च संचार करी. तेव्हां ती त्याला नाना तऱ्हेचे धाक दाखवून फरफटत शाळेंत नेऊन सोडी.

बाकी सर्वांविषयीं ती बेफिकीर असे; पण नवऱ्याशीं मात्र अदबीनें वागून त्याला मान देई. दुसऱ्यांना ती कालिकामूर्ती दिसे; पण नवऱ्यापुढें ती

गोगलगाय बने! पैशाच्या बाबतींत मात्र ती त्याला विचारीत नसे. त्यांच्या संसारांतला बहुतेक पैसाआडका भागेकडेच असे.


दुपारच्या जेवणानंतर पुन्हा दहावीस जाळीं टाकून ती संध्याकाळीं मासळी घेऊन बाजारांत जाई. ती सर्व विकून ती सांजेच्या सुमारास घरीं परत येत असे.

सुखाची संध्याकाळ देण्यासाठींच सर्व दिवसाची ही धडपड!

सबंध दिवसांत सर्वजण आपापल्या कामावर गेलेले;... यावेळीं एका छपराखालीं एके ठीकाणीं सारींजणं जमत!

सकाळीं पुन्हां भागी मरीला घेऊन कामाला लागे. तें पुन्हां संध्याकाळपर्यंत! असं सर्व यंत्राप्रमाणें धडपड भागूच्या हातून कां होई बरं?

उद्यांची आशा!... दुसऱ्यांच्या सुखांत दडलेलं तिचं सुख!... पोरां-बाळांच्या भावी काळाबाबतची उत्कंठा... उत्सुकता!... आशा... महान् आशा!!–



[ ३ ]

# मैना

–१–

सकाळीं उठली,...कीं, ती कामावर जाई.

भांडीं घासणं, धुणं, झाडलोट करणं, पाणी भरणं,...सर्व लहानसान कामं ती बिनतक्रार करी !

त्याबद्दल तिला फक्त पांच टिकल्या मिळत बाईसाहेबांकडून;...त्याशिवाय कधीं मधीं उरलेली भात-आमटी, नाहीं तर चहाचं पाणी काळंसं !...

दुसऱ्या एका नवराबायकोच्या बिऱ्हाडीं ती भांडीधुणीं करी; त्याबद्दल तिला अडीच रुपये मिळत. तेवढीच आपली घरधन्याला मदत !

पाटीचं लगीन; नवरा म्हातारासाच; त्याला मूलबाळ नव्हतं; हिलाही नव्हतं !–

पण स्त्री जात इथून तिथून सारखी ! तिथं गरीबीश्रीमंतीचा भेद नाहीं.

स्त्रीहृदयांतच मातृहृदयाचा समावेश होतो !

मोलकरीण झाली म्हणून काय झालं ? तिला मूल होण्याची का बरं मनीषा नसावी ?...आशा असते माणसाला...

–२–

तसं पाहिलं तर तिला पहिल्या लग्नाचीं दोन तीन मुलं झालीं होतीं;...

पण बिचारीला त्यांतलं एकही लाभलं नाहीं. कांहीं अपुऱ्या वाढीमुळें, कांहीं आजारानें, कांहीं अन्नाच्या अभावानें !...

किती दुःख होई प्रत्येक वेळीं तिला...

शेवटीं तर तिच्या बरोबरीचा तिचा कर्तासवरता घरधनीच निघून गेला !

ती उघडी पडली !...

तिला दुःख कसं होणार नाहीं ? तिलाहि हृदय होतंच ! ओबडधोबड कां होईना,...प्रेमाची कल्पना तिलाही होती ! तिचं तिच्या नवऱ्यावर प्रेम होतंच कीं !... ती अपवाद नव्हती त्याला...

पण प्रेमाची महती कितीही असली तरी गरीबाच्या मागं पोटाचीही ओरड असते ! प्रेमाची किंमत त्यांना कळते; पण प्रेमासाठीं दुःख करण्याचे श्रीमंती चोंचले त्या गरिबांना कुठले पटायला ?...

एकादं मूल असतं तर त्याच्या आशेवर त्याचं संगोपन करीत तिनें आपलं एकलकोंडं आयुष्य काढलं असतं ! पण तसं तिचं नव्हतं कांहीं !...

एकाकी आयुष्य,...पोटाची चिंता,...मूल बाळ व्हावं अशी मनांत दडपलेली तीव्र इच्छा !

—३—

असंच आणखीं एक वर्ष सव्वा वर्ष निघून गेलं.

साधारण चाळिशी उलटलेला माळी जवळच रहात असे. त्यानें एके दिवशीं हळूच तिला आपल्याशीं पाट लावण्याविषयीं विचारलं !

तिनें दोन दिवस विचार करून, त्याला लाजत लाजत अखेर होकार दिला !

त्यावेळीं तिला अगदीं मुग्ध गुदगुल्या होत होत्या !

तिला पुन्हां तिच्या आयुष्यांत गोडी वाटूं लागली होती.

थोड्या दिवसांनीं पाट लागला. माळयाची बायको म्हणूनच ती 'माळीण' झाली !...मैनेला सारेच हांक मारूं लागले-' माळीण— '

नव्या घरधन्याच्या संसारासाठीं 'माळणी' नें मोलकरणीचं काम घेतलं !... आणि ती अगदीं आनंदानें करी तें !

—४—

हल्लीं तर माळीण जास्तच आनंदांत असे !

कां कोण जाणें,...कामं पूर्वीपेक्षां जास्त उत्साहानें करी ती !

गेल्या तीनचार महिन्यांत तिनें बाईसाहेबांकडून एखाद्या दिवसाचीही हक्काची रजा घेतली नव्हती. बाईसाहेबांच्या लक्षांत आलं होतं तें.

“ का गऽ माळणे ? खरं का ? ”

“ होय बाईसाहेब ! ”

“ लाजतेस काय मग ? किती महिने झाले ग ? ”

“ पांचवा सरल आतां आठ दिसान् ! ”

तिच्या आयुष्यांत पुन्हां ओलावा आला होता ! तिच्या हृदयांत आशा खेळूं लागली होती !

आईच्या प्रेमाच्या पान्ह्याची तिला जाणीव होऊं लागली होती !

—५—

भांडीं घासतांना कधीं लहानसा गडू दिसला, कीं ती मनाशीं म्हणे— “माझ्या बाळाला मी असाच घेऊन देईन ! ”

झाडलोट करतांना, ती लहान मोठ्या बाहुल्याबुडकुल्या उचली ; तेव्हां तिचे तशाच तऱ्हेचे विचार चालत !

बाईसाहेबांचा लहानगा बाबू चेंडू खेळतानां दिसला कीं तिच्यापुढं पुढलीं सुखस्वप्नें उभीं रहात. हातांतली केरसुणी राहिलिय् तशीच हातांत...

अडीच रुपये देणाऱ्या जोडप्याकडचे कपडे धुतां धुतां तिच्या हातीं कधीं झबलीं आलीं कीं तिचं वक्षस्थळ जोरजोरानें वरखालीं होई !

दळण दळतांना लहान मुलांवरील ओव्याच तोंडानें येत तिच्या!

तिचं काम आपलं यंत्रासारखं चाले! पण लक्ष कुठं दुसरीकडेच! भावी-काळांत!...चिमुकल्याच्या चिमुकल्या सुखस्वप्नांत!...

काम संपलं कीं घरीं जाई; हल्ली तिला झबलीं शिवण्याची फार आवड वाटे!...त्यासाठीं ती जुनंनवं-रंगीबेरंगी कापडाचे तुकडे गोळा करींत असे.

जुनेरंच नेसलेली ठिबक्याच्या तांबड्या जाड फडक्याचा पदर घेतलेली माळीण...हातांत सुईदोरा न् साध्याशा कापडाचे बारीक बारीक तुकडे घेऊन बसलेलीच सदा दिसावयाची आपल्या खोपटांत!

रात्रींच्या वेळीं, मिणमिण पेटणाऱ्या घासलेट तेलाच्या डबऱ्याजवळ झबलं शिवण्यासाठीं हातांकडे एकाग्र दृष्टी केलेला...काळासांवळाच पण फिक्कट असा तिचा मोहक चेहरा मोठा गंमतीदार दिसे!

—६—

"ताईसाहेब, एवढी मशीन मारून द्या ना!" ती बाईसाहेबांच्या मोठ्या मुलीकडे एकादेवेळीं काकुळतीनें सांगे!

हातानें शिवलेलीं चारपांच चिमुकलीं झबलीं न् दोनतीन टोपरीं झालीं तरी तिची तृप्तता झाली नव्हती! बाईसाहेबांकडच्या शिवण्याच्या यंत्रावर दोनतीन सुंदरशीं झबलीं शिवून घ्यावींत म्हणून तिला फार वाटे!

गरिबांनासुद्धां हौस असतेच कीं!!

"मुलाचा नाहीं अजून पत्ता न् किती घाई ही, माळणेऽ?" ताई थट्टा करी, "बरं पण नांव काय ठेवणार ग?"

माळीण नुसती हंसे! ताई तिची जास्तच थट्टा करी!

"बरं, देतें शिवून! पण गाणं म्हणून दाखव आधीं!!" माळणीचा भसाडा आवाज ताईला ठाऊक नव्हता असं नाहीं; पण ती मुद्दामच सांगे!

पण तीही झबल्यासाठीं लागलीच गाणं म्हणूं लागे! तिचं पूर्वीचं " माळणीबाय, तुझा माळी कुठं ग्येलाऽऽ!" हें गाणं मात्र आतां गेल होतं; त्या जागीं हल्लीं " माज्य सोनूऽल्याऽऽरऽ..." हें गाणं आलं होतं!...

आवाज तोच होता भसाडा; पण हृदयाच्या भावनांत मात्र खूप फरक पडला होता;...त्यांत भावनांची कातरता आली होती!

ती रोज झबल्यांचीं बोचकीं सोडी, पाही,...पुन्हां बांधी!

सारख्या गुदगुल्या करणारी धडपड चाले तिच्या जिवाची!

—७—

" अग, आतांच तर भांडीं घासून गेली ती ना?...न् बाळंत झाली केव्हां म्हणतेस?" बाईसाहेबांना खरोखरच आश्चर्य वाटलं त्या बातमीचं!

दोन तास पूर्वीपर्यंत माळीण नेहमीसारखं काम करीत होती. इतक्यांत गेली केव्हां न् बाळंत झाली केव्हां! माळणीच्या घराजवळची पोर सांगायला आली होती, ती खोटंच सांगते असं त्यांना प्रथम वाटलं!

गेले चारपांच दिवस माळणीच्या पोटांत दुखत असे थोडं थोडं! पण तिचं श्रीमंतांसारखं कसं चालावं?... तीं नेहमीसारखंच होईल तितकं हंसत खेळत आनंदानें काम करी! बाईसाहेबांकडील पाहुण्यामुळें चार दिवस उलट जास्तच काम पडलं तिला;...तरीहि तिचं हूं कीं चूं नव्हतं!!...

आज सकाळीं गेल्या दोन तीन दिवसांपेक्षां जास्त दुखत होतं पोटांत;... पण ती तें असह्य होईपर्यंत काम करीतच होती!

पण मग केव्हां चुटकन् निघून गेली घरीं, समजलं पण नाहीं!

—८—

लांबच्या बहिणीला बोलावलं होतं मदतीला; पण ती वेळेवर नव्हतीच

जवळ !...कालपासूनच झबल्या-टोपऱ्यांची व चिंरगुटांची दोन गांठोडी तिनें आपल्या उशाजवळ ठेऊन दिलं होती !

मुलाला जन्म दिला तेव्हां तिच्या मदतीला सुईण सुद्धां नव्हती ! बाईसाहेबांना व ताईला केवढं आश्चर्य वाटलं !

'स्वतःची सारी बाळंतपणातली व्यवस्था तिनें स्वतःच केली !...काय बाई धाडस तरी !' ताई म्हणाली.

नाळ कापणं, मुलाला आंघोळ घालणं वगैरे सर्व काम पहिल्या दिवशीं तिचं तिलाच करावं लागलं. बोलावलेली बहीण दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आली !...तोंपर्यंत आपल्या घरांत माळीण एकटीच बाई माणूस !...

माळी मदत करीत होता,...पाणी वगैरे तापवून देण्यांत ! पण यापेक्षां जास्त तें काय करणार तो दारुड्या ! !...नि पुन्हां तो एक पुरुष माणूस...

आणि आम्ही मोठीं (?) माणसं अशावेळीं त्यांना मदत करणं साधारणतः शक्यच नसतं ! ! आम्ही पांढरपेशे सुशिक्षित !

मुलाला एकादं झबलं टोपरं घातल्यावर तिच्या जिवाचं समाधान झालं !

काळा सांवळाच होता ! पण चांगला बाळसेदार होता गुलाम !

त्याला कुशींत घेतल्यामुळें व श्रमानें ग्लानी आल्यामुळें तिला गाढ झोंप लागली; तिला जगाचा पत्ताच नव्हता त्यावेळीं.

—९—

नवीं शास्त्रं त्यांना कशीं ठाऊक असणार ?...आणि असलीं असं धरुन चाललं एक वेळ, तरी तीं त्या गरिबांना अमलांत कशीं आणतां यावीं ? ?

माळणीचा मुलगा काळोखांतच असे !...नि काळ्या चिरगुटांचे आणखी थर त्याच्यावर !...

ती त्याला जिवापलीकडे संभाळीत असे !...जणूं तिला जगवणारे तिचे पंचप्राणच ते !...

वारा लागूं नये म्हणून दरवाजे बंद;...नि झोळींतच गुंडाळलेला असे तो !–

तिला काय मुलगा नको होता आपला ? तिच्या दृष्टीनें व तिच्या ऐपतीप्रमाणें ती त्याची पुरेपूर काळजी घेत होती !

पण काय झालं कोणास ठाऊक ?

एके दिवशीं त्या चिमुकल्या बाळाला ताप आला ! ! कफ झाला !...

आणि...आणि...

आणि त्या कोमल शरिराला दुसरीं कसलीं निमित्त लागणार दगावायला ?

दोन चार दिवसांनी कोणी तरी सांगितलं बाईसाहेबांना-" अहो, त्या माळणीचा मुलगा !...चांगला गुटगुटीत होता हो !...पण काल गेला बिचारा !! '

त्यांना मोठं आश्चर्य वाटलं !...पण आश्चर्य वाटण्यासारखं काय होतं ?

माळणीची बहीण आपलं काम संभाळून आली होती; दोनतीन दिवस माळणीकडे होती. मुलाचं वाईट झाल्यावर तीहि घरीं निघून गेली !—

माळणीला मनस्वी दुःख झालं !

तिनें उशालगतचीं झबल्या-चिरगुटांचीं बोचकीं जवळ घेतलीं !... ती ढळढळां रडली त्यांच्यावर डोकं टेकून !

–१०–

पण श्रीमंती दुःखांत व गरिबी दुःखांत फार फरक असतो.

श्रीमंताकडे दुःखाला पुष्कळ दिवस पाहुणचार मिळूं शकतो ! पण गरिबांकडे म्हणजे एकादशीच्या घरीं शिवरात्रच !!...

तेव्हां माळीण महिना संपण्यापूर्वीच पुन्हां कामाला आली !

पूर्वीसारखंच तिला काम करावं लागे !...ती पायमोजेही घालीत नसे न् जोडाही घालीत नसे तिच्या पायांत. पाणी भरणंही करावं लागे तिला...

पूर्वीच्या गड्या घासावयासाठीं डोळयांसमोर धरूंही नये असं तिला वाटे !

केरकचरा काढतांना बाहुल्याबुडकुल्या उचलायचं तिच्या जिवावर येई.

अलिकडे दळतांना तर तिच्या तोंडाला कुलुप पडलेलं असे !

जी हल्लीं एरव्हींहि फारसं बोलत नसे दळतांना ती गाणं तरी कसलं गुणगुणणार ?

## —११—

माळीण नदीवर कपडे धूत होती. धोतरं–लुगडीं धुवून त्यांचे पिळे तिनें बाजूला दगडावर ठेवले होते. तिचं फक्त विचारचक्रच चालू होतं !

तिच्या हाताला धुण्याच्या कपड्यांत एक झबलं लागलं.

बराच वेळ झाला तरी ती झबलं पाण्यांत बुचकळतच होती. तिच्या हातावर तिचा ताबा नव्हताच मुळीं !...डोळयांतून सारखे अश्रु वहात होते !

पुष्कळ वेळानें तिला एकदम आठवण झाली. दचकून ती भानावर आली.

ती भरभर बाकीचीं धुणीं धुवून सर्व पिळे घेऊन घरीं आली !

" किती उशीर हा, माळणीऽ ? " तिला बाईसाहेबांचं रागाचं बोलंण ऐकूं आलं. ती तरीहि गप्पच राहिली. बाईंनी पुन्हां तक्रार केली.

" झाला खराऽ, बाईऽ ! " दाटल्या कंठानें ती कसंबसं म्हणाली.

## —१२—

काम संपवून ती घरीं आली !...घराकडे येतांना तिचीं पावलं जडजड पडत होतीं....

घरीं आल्यावर बिछान्यावर—चिरगुटांवर डोकं धरून ती बसली !

झबल्याचं बोचकं उघडून ती पुन्हां पुन्हां एक एक उलगडून पहात होती.

मुद्दाम मिशिनवर शिवून घेतलेलीं तीं झबलीं ! तिच्या हातून तीं गळूनच पडलीं !

—आणि त्याच वेळीं तिच्या डोळयांतून घळघळां अश्रूहि गळाले !...

[ ४ ]



# गंगा —पाटीवाली

—१—

चार वर्षांचा राम्या काल रात्रींपासून तापानें फणफणत होता. रात्रीं तिनें शेजारच्या माळ्याच्या हातांपायां पडून गवती चहाच्या चार काड्या आणून त्याचा ' उन उनीत काढा ' त्याला पाजला होता. पण त्याचा ताप कांहीं उतरला नव्हता.

त्याला सोडून गंगेला आपल्या पाटीच्या धंद्यावर जाणं बिकट वाटत होतं. पण न जाऊन तरी कसं चालेल ? त्याला जवळच्या डाक्तरनें दूध पाजायला सांगितलं होतं !...तें कोठून आणावयाचं ? आपल्याला नाहीं तर नाहीं, रखमीला तरी दुपारला भाकर नको का जेवायला वाढायला ?...

" पोरी, रातची भाकर हाय थाळींत ! ती खा तूं न् राम्याजवळ बस ! मी येन तवर बिगिबिगी दूध आन् औशाद घेऊन, व्हय्... " तिनें आपल्या सातआठ वर्षांच्या मुलीला सांगितलं.

जीव तीळतीळ तुटत होता, तरी तिनें पाटी व चुंबळ डोक्यावर टाकून दाराबाहेर धांव ठोकली.

—२—

ती बाहेर पडली खरी;...पण तिचं चित्त सर्व घराकडेच परतत होतं. 'रखमी पोर घरीं बसली खरी; पण ती तरी काय ? कालची पोर ! ती काय संभाळणार त्याला ? न् राम्याचा ताप कसला असेल ? त्या घोंडेचा मुलगा

नव्हे का परवां सहा दिवस ताप येऊन मेला ? आणि त्या मनेच्या पोरीलाही असंच कांहीं तरी झालं !—'

तिच्या डोक्यांत विचारांचं नुसतं काहूर माजून राहिलं.

' देवा तूंच तारणार रेऽ पोराला ! ' तिच्या तोंडून उद्गार आले.

तरी पण एखाद्या यंत्राप्रमाणें तिचे पाय तिला बाजाराकडे नेत होते.

पाऊस जोरानें पडूं लागला नसता तर ती तशांच कितीतरी वेळ चालली असती. तिनें खांद्यावरील गोणपाटाची खोलपट कुंची आपल्या डोक्यावर टाकली व वर तिची हरकामी टोपली निवारणार्थ ठेवली. पाऊस पडत होता व ती भिजत होती. पण टोपली व गोणपाट डोकीवर असल्यामुळें तिच्या मनाची समजूत तरी होत होती.

गंगी बाजारांतल्या नेहमींच्या दुकानापाशीं जाऊन आडोशाला उभी राहिली. टोपली व गोणपाट काढून ठेऊन तिनें आपल्या भिजलेल्या लुगड्याचा ओलाचिंब पदर पिळून काढला.

" गंगेऽऽ ! प्वाराचं बरा हाय ना ग ? " लांबून खांद्यावर रिकामी टोपली अडकवलेली व तिच्यासारखंच डोईवर गोणपाट टाकलेली सखू तिच्याजवळ येतांना तिला दिसली.

"नाय गऽ! आंगाचा भडका होतुया जनुं! तवा रखम्येला म्हनलं, पोरी बस त्येच्यापाशीं, न् आल्यें निघून ! " त्यांच्या बराच वेळ त्याच गोष्टी चालल्या होत्या. लंगड्याला पांगळ्याचाच आधार असायचा जगांत !...

—३—

पावसानें तर सकाळपासून ठाणंच दिलं होतं.

मधून मधून मोठमोठ्या सरी येत. एऱ्हवींहि सारखा झिम् झिम् पडतच होता. त्यामुळें आज खरेदीला लोक फारसे येत नव्हते.

गंगीनें बराच वेळ वाट पाहिली. पण कोणी गिऱ्हाईक दिसेना.

तिच्या डोक्यांत पुन्हां विचार डोकावूं लागले. " पोराचा ताप उतरला असेल का ? त्याला झोंप लागली असेल, का 'आई आई' करत रडत पडला असेल ? त्याला दूध पाजायला पाहिजे ! पण पैशाशिवाय दूध कुठचं आणणार ?–रखमी-पोर लहानच !–बसली असेल जवळ, नाहींतर गेलीहि असेल जवळपास खेळायला! अन् राम्या बिछान्यावर एकटाच;..अग बाईऽ"

एक गिऱ्हाईक दुकान चढतांना पाहून ती पुढं होऊन अदबीनें म्हणाली,

—' शेट, पाटीवाली पाहिजे का ? '

तो मनुष्य दुकानाच्या पायऱ्या चढत तिच्यावर ओरडून म्हणाला-' थांब ! उगीच मधें मधें धडपडूं नकोस ! पाहिजे तर सांगेन मी ! '

म्हणजे अजून आशा साफ नष्ट झाली नव्हती.

फडक्याची चुंबळ करीत ती त्याची वाट पाहात बाहेर उभी राहिली.

—४—

जसजसा वेळ अधिक होऊं लागला, तसतसा गंगेचा जीव खालीं वर होऊं लागला. पुन्हां राम्याविषयींचे विचार तिच्या मनांत येऊं लागले.

पाऊस पडतच होता. तो गृहस्थ बराच वेळ दुकानदाराबरोबर गप्पा मारून बाहेर पडला. पाऊस असल्यामुळें आज सामान नेण्याचं त्यानें तहकूब केलं होतं.

गंगेनें इतका वेळ धरून ठेवलेली आशा एका क्षणांत नष्ट झाली !...

तिला पैसे पाहिजे होते. त्याच्यासाठीं ती अंगमेहनत करायला, त्रास सोसायला तयार होती. पण तेंही आज निरुपयोगी ठरलं.

एक एक क्षण तिला मोलाचा वाटत होता.

दुसऱ्या एका दुकानांत एक गृहस्थ शिरतांना गंगेनें लांबून पाहिला. तिनें चुंबळ, टोपली घेऊन तिकडे भिजत भिजत धांव ठोकली.

९३८३ ११/१/५२

" शेट, पाटीवाली--"

" हं! पाहिजे आहे!"

गंगेचा जीव एकदम खालीं पडला. सौदा ठरेल तेव्हां ठरेल. पण आपल्याला गिऱ्हाईक मिळालं या आनंदांतच ती होती...

'आतां आपण तें सामान त्याच्या घरीं पोहोंचवूं. मग तो देईल त्या पैशाचं दूध नेऊं; दाक्तरच्या हातांपायां पडून पडून औषध नेऊं. रम्याला दूध देऊं! त्याचा ताप आतां उतरला असेल...'

कितीतरी विचार तिच्या डोक्यांतून वेगानें निघून गेले.

—५—

घेतलेले जिन्नस तिनें भराभर टोपलींत भरले व उचलून घेण्यासाठीं तिला हात घातला.

" थांब, पाऊस ओसरूं दे जरा!" तो गृहस्थ म्हणाला, " आणि काय घेणार आहेस हेल?"

" कुठं जायचं, शेठ?" धडधडत्या छातीनें गंगी म्हणाली.

"रामाच्या देवळाजवळ! जवळच आहे!" तो गृहस्थ स्वतःच अंतर कमी करण्याच्या हेतूनें म्हणाला, " हं मग काय घेणार?"

"शेट, तुम्ही काय कमती द्याल? चला..."

तिला जाण्याची अगदीं घाई झाली होती.

" बऽघ! ते तसले चाळे नकोत! मागाहून तुम्ही लोक किटकिट करतां!" तो गृहस्थ कुऱ्यांत म्हणाला. " हो, आधींच आपलं ठरलेलं चांगलं! नाहीं जुळलं तर दुसरी!—मग बोल लवकर काय घेणार तें?..."

" चार आनं द्याऽ शेट!" गंगीनें हाताचीं चार बोटं दाखवलीं.

"काय? मी-तर नेहमीं दोन आण्याला नेतों न् तूं चार न् पांच आणे सांगूं लागलीस तर कसं जुळणार?" गृहस्थ सौदा करूं लागला.

"साहेब, पन दोनअडीच मैल जायचं इक्तं ओझं घेऊन, त्ये च्यार आनं पन नकोत गरिबाला? आमच्या पोटाकडं....." काकुळतीला येऊन गंगी म्हणाली.

तिच्या डोळ्यांसमोर आजारी रम्याचं चित्र दिसत होतं!!...

"तें कांहीं नाहीं. अडीच आण्याला येत असलीस तर उचल टोपली; नाहीं तर मी दुसरी कोणीतरी शोधतों!" तो बेफिकीरपणें म्हणाला.

घरीं जाण्याची तर उत्कंठा! तेव्हां तिच्या मनांत एकदम कबूल करण्याचं आलं. 'अडीच आणे तर अडीच आणे! हें हातचं सोडूं नये!'

पण तरी जरा ओढून पहावं म्हणून ती दुबळ्या स्वरानें म्हणाली, "असं कसं करतां, दादा? नाई नाई तरी तीन आनं द्याच!"

"बरं चल! उचला पाटी! अन् जातांना वाटेंत मला चार पांच वस्तु घ्यायच्याहेत बरं का?" सौदा चांगला पटवला म्हणून आनंदून, एक नवी अट लादीत तो म्हणाला.

(एक आणा तर एक आणा. तेवढाच कमी झाला. बाकी किती ठिकाणीं कसाही पैसा गेला तरी फिकिर नाहीं. पण असल्या कांटकसरीनेंच आम्ही खूष असतों.)

—६—

गंगीनें पाटी उचलून डोक्यावर चढवली.

असलीं चांगलीं खाद्यं, पेयं ती रोज निरनिराळ्या लोकांकडे पोहोंचवीत असे. पण तिला भाकर चटणीशिवाय जास्त कांहीं मिळण्याची आशा नव्हती; आणि ती भाकर चटणीसुद्धां धडपड केल्याशिवाय मिळणं अशक्य होतं! नवरा परागंदा; फक्त कुंकवाचा धनी!—

अडीच तीन वर्षांपूर्वी तो एकाएकी नाहींसा झाल्यापासून दोन मुलांचं व तिचं स्वतःचं अशीं तीन पोटं तिच्या अंगावर पडलीं होतीं. पण जें मिळेल त्यांतच ती संतुष्ट असे.

जातांना वाटेंत तिला तिच्या घराला जाणारा रस्ता लागला. तिच्या मनांत सरळ जाऊन राम्याला बघावं असं कितीदां आलं !

परंतु तिच्या डोक्यावर सामान होतं. डोक्यांत पैशाचा विचार चालला होता. पैशाशिवाय जगांत काय आहे? पैसे असते तर आजती बाहेर तरी कशाला पडली असती ? म्हणून तर एवढी सगळी धडपड !

'अगदीं जवळ' असलेलं रामाचं देऊळ चांगलं दीड दोन मैल लांब ठरलं; मग सामान काढून ठेवल्यावर ठरलेले तीन आणे कसेबसे तिच्या हातांत पडले.

—७—

घाम पुसून तिनें ते पैसे कनवटीला घट्ट गांठ मारून संभाळून ठेवले व ती घराकडे चालूं लागली.

घर जसजसं जवळ येऊं लागलं तसतसं तिचं काळीज जास्तजास्तच धडधडत होतं. राम्याचा ताप ? रखमीची भाकर......पुन्हां सर्व त्याच प्रश्नमालिकेला ती आपली समजूत करीत आपल्या मनाप्रमाणें उत्तरं देत होती.

पावसामुळें ती बरींच भिजली होती. पण त्याची तिला मुळींच खंत नव्हती. ती झपूझप् पावलं टाकीत घरचा रस्ता कांटीत होती.

बरोबर घेतलेल्या भांड्यांत तिनें जातांजातां जवळच्या एका हलवायाकडून अर्धा शेर दूध घेतलं. राहिलेला एक आणा तिनें तसाच सांभाळून ठेवला.

"रखमे ! पोरी हायेस तरी कुठं ?" ती घरांत शिरतां शिरतां रखमेला ओरडून म्हणाली.

तिनें बिछान्यावर पाहिलं तर कोणी नाहीं. रखमी तिथं नव्हती; राम्याही बिछान्यावर नव्हता.

तिच्या पोटांत धस्स झालं. हीं पोरं गेलीं तरी कुठं ?

मन चिंती तें वैरी न चिंती !

—८—

इतक्यांत घराबाहेर तिनें रखमेचा मोठ्यानें हांसण्याचा आवाज ऐकला.

ती एकदम धांवत बाहेर आली; मध्यें बाहुली ठेऊन, रखमी न् राम्या हंसत हंसत भाकर खात बसलीं होतीं मागच्या बाजूला !

" आयेऽ, आलीस ? तुला ठेवली हाये भाकर न् चटणी !" रखमी हंसत हंसत आईजवळ धांवली न् म्हणाली.

गंगीनें राम्याच्या अंगाला हात लावून पाहिलं !– त्याचं अंग गार होतं. तिनें त्याला आपल्या पोटाशीं घट्ट आवळून धरलं. नंतर वर करून त्याच्याकडे टक लावून पहात पहात त्याचे मटमट मुके घेतले.

राम्यानेंही आईला घट्ट मिठी मारली. रखमी मागून येऊन आईच्या पाठीवर डुलूं लागली. तिलाही गंगेनें जवळ ओढलं. तिला, त्यांना आनंद झाला.

पण त्या निष्पाप व निर्मल मनाच्या बालकांना, आपल्या आईच्या शरीराची नि मनाची पांच मिनिटांपूर्वी, आपल्यासाठीं काय धडपड होत होती, याची जाणीव कशी होणार ?

—९—

गंगेला मात्र आतां नवा जोम आला. तिनें घरांत असलेल्या थोड्याबहुत पिठाच्या दोन ताज्या भाकऱ्या भाजल्या. नवी नवी चटणी केली. आणलेलं दूध तापवून त्यांनीं आपलं जेवण केलं.

राम्याला औषध कशाला पाहिजे होतं ? आईचं प्रेम हेंच त्याचं औषध !

गंगीला तरी या मुलांमुळेंच निराशेंत आशा उत्पन्न होई ! त्यांच्यासाठीं तिनें वाटेल ते केलं असतं; केलं होतं; करत होती !

तीं मुलं म्हणजे चालत्या बोलत्या आशाच होत्या तिच्या ! !

निखळलेली
चांदणी



[ ५ ]

## —माईंचा रमेश—

—१—

काजळ्या रात्रींत चंद्राची कोर शोभत होती. भोंवतीं असंख्य चांदण्या चमचमत होत्या. वाऱ्याच्या जोरावर काळेपांढरे ढग भरारत होते.

वनिता आकाशाकडे पहात होती. माई आपल्याच विचारांत गढल्या होत्या.

' इवलुसा चंद्र ! पण त्याच्या भोंवतीं किती चांदण्या चकाकताहेत ग !'

तोंच एका काळ्या ढगानें पहातां पहातां त्या इवल्याशा मोहक चंद्राला घेरलं. हळू हळू तो ढगाआड गेला; अन् त्याच्या भोंवतालच्या चमचमणाऱ्या चांदण्याही दिसेनाशा झाल्या.

माईंना तो एका क्षणांत बदललेला देखावा थोडासा असह्यच झाला !...

" एक तरी दिसते आहे का पहा आतां ? सगळ्या त्या चंद्राबरोबरच त्या काळ्या ढगाच्या जाळ्यांत पडल्या !...... "

—२—

बहिणीच्या मांडीवर डोकं ठेऊन वनिता आकाशातील तो सर्व देखावा पहात खाटेवर पडली होती.

' पडल्या '—शद्बावरुन तिला आठवण झाली—तिनें विचारलं...

" माई तारा पडला म्हणजे काय होतं गऽ ?"

" काय पोरकट प्रश्न !–अग, कोणीतरी सत्पुरुष म्हणे जन्म घेतो !"

माईनीं प्रश्न पोरकट ठरवला. पण आपण होऊनच माहितीहि सांगितली.

" अस्संऽ ? तो येतो कुठून ?...जातो कुठं ?"

त्या पोरकट प्रश्नाला जास्त उत्तरं देण्याचं कारण नव्हतं. पण त्यांचंच मन त्यांना खाऊं लागलं–"तारा पडतांना बोलूं किंवा बोट दाखऊं नये !"

माईचं वाक्य संपण्यापूर्वी 'तोऽऽ...' करीत वर पहात वनिता पडल्या जागे-वरून झटकन उठली.

माईचं लक्ष त्याच वेळीं आकाशाकडे गेलं होतं. एक चकाकित तारा सर्‌कन आपला तेजस्वीपणा झरवीत खालीं येऊन घराच्या मागच्या बाजूस पडल्यासारखा त्यांना दिसला !

'हं...हं...' करून त्यांनीं वनितेला दटावल्यामुळेंच तिचे 'तोऽऽ...' नंतरचें शब्द तसेच तोंडांतल्या तोंडांत जिरले ! दाखवण्यासाठीं पुढें करीत असलेला हात तिनें तसाच अर्धवट मागं घेतला !

## –३–

" किती उतावीळ ग तूं, वनूऽ !" क्षणभराच्या शांततेनंतर, माई तिच्या स्वभावाला दोष देऊं लागल्या ! " मी सांगत होतें तरी हात पुढें करायाला तुझी तयारी आपली !..."

" पण दाखवला का हात ? एक चकार शब्दही नाहीं बोललें ! "

" कुठंसा पडला ग तो, वनूऽ? "

" मी मघां विचारला प्रश्न तो पोरकट झाला ! न् तूं आतां इतक्या साध्या गोष्टींचा कसून तपास लावते आहेस...तो तुझा ' थोर ' पणा वाटः ? काल शेजारच्या मधूनं आपला पडलेला दांत घरावर टाकलाच आहे ! " वनिता माईकडे पहात मोठमोठ्यानें हंसूं लागली.

" आचरट आहेस झालं ! "—माई किंचित् ओशाळल्या–लाजल्या.

" अन् हें बघ ! " वनितेला आतां आणखीच जोर आला होता. " तो तारा नाऽ, या घरच्या उजव्या बाजूच्या बिऱ्हाडावरच पडला हो ! नि...त्या बिऱ्हाडाची मालकीण तूंच ! काय समजलीस ? तेव्हां..."

" छमजलं बलं, वनुताई !" माई तिला वेडावून म्हणाल्या, " मी लहान का तूं माझी अशी थट्टा करायला ? चावट् नाहींतर !!"

त्यांनीं लटक्या रागानें वनितेच्या गालावर हळूच एक चापट मारली !

तरी पण ती खस्याळपणें हंसतच होती....

—४—

आज द्वारकामाईंच्या गरिबाऊ घरांत न्याराच आनंद थबथबला होता !

एका खोलींत, एका खाटेवर माई पडून होत्या. त्यांचा चेहरा फिक्कट दिसत होता. डोळे थोडेसे खोल गेले होते. अंगावर पांघरूण होतं. समोरच त्यांच्या हाताच्या पांघरुणाखालीं फडक्यांत गुंडाळलेलं एक बोचकं होतं !

आणि त्यांतच त्यांच्या आजच्या सर्व ' आनंदाचा कंद ' होता.

" कॅं हॅं ! कॅं हॅं !!" त्यांच्या ' आनंदाच्या कंदाला ' वाचा फुटली ! माईंची चुळबूळ सुरूं झाली. त्यांनीं त्याला जवळ ओढलं; छातीशीं धरलं...

संपलं ! एवढ्यांतच एकमेकांना एकमेकांची ओळख पटली ! तें चिमुकलं बालक आईच्या छातीवर हात टाकून दूध पिऊं लागलं !

माईंना आपल्या जीवनांतली...त्रिभुवनांतली धन्यता वाटली !!

' काय माईसाहेब ?' वनिता येऊन माईंना चिडवूं लागली. " तो चकाकित तारा आठवतो का त्या दिवसाचा ? तोच बरं हा !..."

माईंना गुदगुल्या झाल्या; पण त्यांना चपापल्यासारखंही झालं क्षणभर !—

"अहो राजेश्रीऽ,...बघूं...बघूं तरी आपलं तोंड? हं दाखवा ना?" वनिता खाटेपासून थोडी लांब उभी राहून त्याला न्यहाळून पाहूं लागली.

माईनीं त्याला तिच्या बाजूला फिरवला.

बाळ बाळसेदार होतं. लालबुंद अंग! वाटोळं तोंड! गोलाकार डोकं! उजेडाला दिपल्यासारखे डोळे करून तें आपले मुठी आवळलेले हात हलवीत हलवीत रडूं लागलं!

"कायरे गुलामाऽ...ठोसे रे कशाला ते?...मला ओळखलंस?–अरेऽ मी तुझी मावशी;...तुला घ्यायला आलें!..."

तेवढ्यांत बाळ रडूं लागलं!...मावशी वरमली...

"आईलाच नसेल ओळखत तर मावशीला काय ओळखणार, कपाऽळ?" वनिता माईना हिणवण्याच्या उद्देशानें हंसून म्हणाली.

"अस्संऽ? बघ हं! आतांच दाखवतें तुला आईला तो ओळखतो का नाहीं तें!" असं माईनीं क्षीण आवाजांत म्हटलं व त्याला फिरून जवळ घेतला.

त्याचं रडं कुठच्या कुठं नाहींसं झालं. तो पूर्ववत् लुचुंलुचूं करूं लागला.

माईनीं विजयी मुद्रेनें वनितेकडे पाहिलं. तीहि तें सर्व दृश्य पाहून कौतुकानें हंसत होती.

त्याक्षणीं तर माईना धन्य धन्य वाटलं!!

–५–

"नाक चांगलं तरतरीत आहे..." "काय हो मुलगाच ना?..." "बरं झालं बाई! हा तरी बिचारीच्या नशिबाला लागो!"–शेजारच्या इंदिराकाकू, सखूमावशी वगैरेंची चौकशी–चिकित्सा चालली होती!

माईच्या डोळ्यांतून झरकन् कितीतरी विचार येऊन गेले! त्यांच्या डोळ्यांपुढें त्यांच्या या पूर्वीच्या अशाच सुंदर मुलाची मूर्ति उभी राहिली! पण बिचाऱ्याला देवानें आयुष्यच कमी घातलं होतं.

" देवाऽ ! माझ्या या बाळाला तरी दीर्घायुषी करायला चुकूं नकोस ! पाहिजे तर माझं थोडसं आयुष्य कमी केलंस तरी चालेल !" माई पडल्या पडल्या वर पाहून प्रार्थना करायला चुकल्या नाहींत ! त्यांनीं आपल्या नव्या बालकाकडे पाहिलं व त्याला आपल्या जास्त जवळ ओढलं !...त्या मनांत म्हणाल्या..." एवढा तरी राहूं दे..."

जणुं काय त्याला त्यांच्याकडून कोणी त्याक्षणीं घेऊनच जात होतं !!

—६—

बारा दिवस केव्हां गेले समजलंसुद्धां नाहीं !

बाळाला स्वतःच्या नांवाविषयीं कांहींच वाटत नव्हत ! पण त्याचं नांव ठेवतांना कोण रुसवा, फुगवा न् काय भांडाभांड !—

मावशीच्या मनासारखं झालं शेवटीं ! तो 'रमेश' म्हणून जगांत ओळखला जाण्याचं ठरलं !!

त्याला त्यांत सुखदुःख कांहींच नव्हतं ! हातपाय हालवणं, आईचं दूध पिणं, रडणं नि देवाशीं हसणं...याशिवाय त्याला दुसरं काय कळणार ??

—७—

रमेश आतां मोठा झाला होता !—म्हणजे कांहीं वर्षं गेलीं नव्हतीं; आतां तो सारा अकरा महिन्यांचा झाला होता ! जगांत येऊन तो आपल्या पायांवर पुरता चालूंही लागला नव्हता.

आईला आपलं मूल सजवावंसं कां वाटणार नाहीं ? माई रमेशला तसं कांहीं फारसं सजवीत नसत ! पण तें पोरच मोठं गोड होतं ! कोणताही कपडा घातला तरी त्याला खुलून दिसे.

त्या मोठ्या व वाटोळया डोक्यावरील रेशमी व थोडेसे वर उडणारे केस;.. विशाल कपाळ, रेखीव व कमानदार भिवया; लांब केसाच्या पापण्यांचे काळे-

भोर व वाटोळे असे विशाल पण चंचल डोळे;...सरळ व तरतरीत नाक;... वाटोळ्या फुगीर गालांच्या मोहक गुलाबी छटेंत त्याचे हांसरे तांबसर ओठ तर मोठे सुंदर दिसत! काळ्याभोर केसांतून हळूच डोकावणारे मोठे कान व दोन रेखीव भुवयांतील बालकांची जन्मसिद्ध हक्क असलेली तकाकणारी वाटोळी काळी तीट!...तिनें तर त्याचं मुखकमल-हो,...कमलच होतं तें!-फारच खुले!!

रमेशला आतां आपलं नांव समजूं लागलं होतं! सर्वांनाच वाटे 'माईंचं हें शिंगरूं पुढें नांव काढणार!!'

-८-

'रमेऽऽश ये,' म्हणून म्हटलं कीं कोणाकडेही रमेश झांप टाकी! दांत नसलेलं आपलं लाळ गळणारं बालिश बोळकं उघडून तो हसूं लागला, कीं, वाटे,...त्याच्या कोंवळ्या गालावर फाडफाड फटाके देऊन याला रडवावा!

"माई बघा तरी आपलं हें विचित्र ध्यान!!"—माईही आपल्या लेंकराकडे प्रेमपूर्ण नेत्रांनीं व मोठ्या अभिमानानें टक लावून पहात.

रडणं तर त्याच्या गांवींही नव्हतं-पण त्यामुळेंच बापडा सदा रडकुंडी येई..

सगळ्यांना तो आपल्याजवळ असावा ही इच्छा! पण त्या ओढाताणीमुळें त्याचे मात्र नाहक हाल होत!......

सदा हंसतमुखी पोर रडवण्यांत यश मिळाल्याचा आनंद कांहीं औरच असतो! आणि तो अनुभवण्याचा सर्वच प्रयत्न करीत व त्याला सारख त्रास देत! त्याचं रडंच सर्वांना हंसवी!!

त्याच्या भोंवतालीं नेहमीं जमलेला मुलींचा घोळका पाहून त्याच्या मावशीला 'गोकुळांतील बाळकृष्णा'ची आठवण होई।

त्याच्याभोंवतीं त्याच्यासाठीं भांडणाऱ्या मुलीकडे माई कौतुकानें पहात रहात! त्यावेळीं मुलींच्या एकमेकींना चाललेल्या वांकुल्या पाहून, त्यांना

चतुर्थीच्या चंद्रामोंवतीं एकमेकांना डोळे मिचकावणाऱ्या तारकांची पटकन् आठवण होई !

पण त्यांची दृष्टि त्यानंतर लगेंच मधल्या चंद्रावरच केंद्रित होई; नि त्याची पौर्णिमेपर्यंत कशी वाढ होत जाईल, या विचारांतच त्या गर्क होऊन जात !!...आणि मनाची झांप पौर्णिमेकडून नकळत आमावास्यकडेहि पडे.

अशावेळीं माई भोठ्यानें दचकत !...

—९—

आणि शेवटींहि नको तेंच झालं ! त्यांच्या मनीं नेहमीं डोकावणारी भीतीच खरी ठरवण्याचा घाट कोणीतरी घातलेला दिसूं लागला !

कर्तव्यानें व योग्यतेनें मोठा होणारा माणूस वयानेंही मोठा होऊं नये अशी अज्ञात इच्छा होती ! सुंदर बीं रुजल्यावर पूर्ण वाढण्यापूर्वींच तें कीटकांकडून खाल्लं जावं अशी भवितव्यता होती ! !

कर्तुमकर्तु-शक्तीचं सर्व 'परिहासेन' चाललं होतं; पण दुबळ्या जगाला,... दुबळ्या जीवाला...तें 'परमार्थेन' वाटून असह्य त्रास देत होता ! !

'गोकुळांतला बाळकृष्ण',...'चतुर्थीचा चंद्र'—माईचा रमेश-आज दहा दिवस आजारी होता !...बिछान्यावर तळमळत होता.

—१०—

आईचं हृदय क्षणोक्षणीं तिळतिळ तुटत होतं; पण कांहीं चालत नव्हतं !

बापाचं अंतःकरण धडपडत होतं;...पण कांहीं उपाय नव्हता !

मावशीचं हृदय उचंबळून येत होतं—पण त्या ओलाव्याचा त्या निर्दय रोगापुढं कांहीं इलाज नव्हता !...

डॉक्टर जवळ बसले होते; पण त्यांना कांहीं करतां येणं शक्य नव्हतं !...

...चतुर्थीच्या चंद्राची पौर्णिमेपर्यंत वाढच व्हायची नव्हती !
तारा थोडासाच चमकून समूळ नाश पावणारा होता !!...

## –११–

म्हणूनच रमेश सर्वांना सोडून निघून गेला !

नियतीनें निष्ठुर करमणुकीचा कळस केला !!

माईच्या चांदव्याबरोबरच त्याच्या भोंवतालच्या 'इतक्यांतच स्पष्ट दिसणाऱ्या' त्यांच्या हृदयाकाशांत लुकलुकणाऱ्या असंख्य आशातारका, काळाच्या झंझावातांत फिरणाऱ्या काळ्याकभिन्न ढगांच्या जबड्यांत गडप झाल्या ! माईभोंवतीं पुन्हां पूर्ववत् निराशांधःकार पसरला !!

रमेश जगांत थोडासाच चमकून गेला; सर्वांच्या अंतःकरणांतही थोडासा चमकेल ! पण—पण—माई ? त्यांच्या हृदयाची कल्पनाच करतां येत नाहीं !!

## –१२–

...आतां पुन्हां कधीं तारा पृथ्वीवर पडतांना वनितेला दिसलाच, तर आपले डोळे थोडा वेळ बंद करून घेऊन ती मनांत त्याला म्हणते, "वेड्या, क्षणभर जास्त चमकण्याच्या मोहानें जगांत उडी घेण्यासारखं त्यांत आहे तरी काय एवढं ? क्षणिक मोहाला बळी पडून स्वतःला व दुसऱ्यांनाही दुःखी करण्यापेक्षां...तिथंच...नि तसाच सतत चमकत राहिलास तूं, तर किती बरं होईल ?..."



# वात्सल्य [ ५ ] —पाळण्याची दोरी—

—१—

"बाळ, इकडे येऽरे जराऽ !...मला तुझा गोडसा पापा देऽ एक !" अंथरुणाशीं खिळलेल्या माझ्या माईनें मला खेळतांना पाहून हांक मारली; ताईनेंही मला हातानें जवळ येण्यास खुणावलं !

पण मुलं नि फुलपाखरं सारखीं ! मग मी कसला तिथं रहातोय् ?...

'अंऽ...मी नाहीं जाऽ आतां ! थांबरेऽ बापू...आलोंच मी; तूं लप, मी शोधतों तुम्हाला..."

आणि मी दुडुदुडु धांवत पसार झालों !

पण त्यानंतर माई कायमची लपली; तिच्याशीं तेव्हांपासूनच मी लंपडाव खेळतोंय् !...पण ती मला सांपडत नाहीं; मी पुरा हरलों !...

—२—

त्यावेळची तिची ती पितवस्त्रांतील कुंकुमचर्चित मूर्ती माझ्या अजूनही हुबेहूब डोळ्यांसमोर येते !

मी खोलींत तिच्याजवळ जातांच वडिलांनीं आपले डोळे पुसून मला उचलून घेतलं.—माई...समोरच होती; गाढ झोंपली होती वाटतं...

पिवळं पिवळं पातळ; कपाळावर लालभडक कुंकुवाची चीर; किंचित् हंसरा, गोरा चेहरा;...

भोंवतीं ताई, अक्का वगैरे सर्व बसून रडत होत्या. सर्वांकडे मी कावरं-बावरं पहात होतों! पहातां पहातां मी पण रडकुंडी फिरलों.

" चल् वेडाऽ कुठलाऽ! आपण आपलंऽ आतां खेळायला जायचं हंऽ बाहेर!" माझा खालचा ओंठ पुढं मागं थरथरतांना पाहून, वडील माझ्या डोक्याचे केस मागं सारीत मला वात्सल्यानें म्हणाले.

"मग ताई कां होऽ रडते?" पुन्हां उल्हासाची लहर आल्यासारखं होऊन मी त्यांना उलट विचारलं.

" उगीऽच (!);वेडी आहे ती! माईला पाहिलीस ना?...हं! झालंऽ तर!—आतां बाहेर जा खेळायला. आम्ही तिला देवाघरीं पोहोंचवून येतों." वडील मला खालीं सोडत म्हणाले.

" देवाच्या घरीं?" मी लाडानें त्यांचं धोतर ओढीत वर पहात म्हणालों....

" हंऽ"...

"मग मज्जाऽ! मी जाऊं तिच्याबरोबर? तिच्याच बरोबर परत येईन...."

" चल् मूर्खंऽ! खेळायला जा पाहूं आधीं बाहेर."

त्यांनी डोळे कां पुसले तें त्या वेळीं मला जरा देखील समजलं नाहीं!

—३—

"कायरे, तुझी आई मेली ना?" शेजारच्या अंगणांत मला कोणी सोबत्यानें विचारलं.

" मेली? नाहीं बाऽ!...ती कनीऽ, वर देवाकडे गेली आहे. मी पण तिच्याबरोबर जाणार होतों!"

"वेऽडाऽ!"

" पण मेली म्हणजे रे काय ? "

त्यानें काय सांगितलं कोण जाणें ?....पण अज्ञानांत अतिशय आनंद असतो !

आणि त्यानंतरहि ताई वगैरेंना रडतांना पाहून मला कोडंच पडे; मी अर्धवट स्वतःचा व त्यांची समजूत करण्यासाठीं थोडं रडकुंडीला येऊन विचारीं–" मी बघ बरं किती शहाणा ? जरा तरी रडतों का ?...आपली माई परत येणार आहे ! "

हो, त्या वेळीं मी मुळींच रडलों नाहीं ! पण आतां —

–४–

कोंवळा वेल वळवावा तसा वळतो !...तसंच मुलाचं मोठेपण देखील आईच्याच हातीं !—

पण...पण,–' जिचे हातीं पाळण्याची दोरी '...या म्हणीप्रमाणें, स्वतःचाच नव्हे, तर आपल्या देशाचा व पर्यायानें जगाचा उद्धार करण्याची शिकवणूक देणारी...माझी मातृदेवी ! मी जगांत आल्यावर डोळे उघडून सभोंवर पहातों न पहतों,...त्यांतील दोन चार चित्रविचित्र रंग अवलोकन करतों न करतों,...तोंच, ती मला कायमची सोडून निघून गेली !!...

किती मी अभागी ? अशा या मातेच्या शिकवणीचा आस्वाद न घेतलेल्या ठोंब्याच्या जगाला काय उपयोग !...त्याच्या कृतींना जगांत कोण धन्य म्हणणार ?...त्याला कसलं महत्व येणार ?...

–५–

मला वाटतं,...देवाला चांगलीं माणसं फार आवडतात ! म्हणून तो त्यांना या जगांत फार वेळ ठेवीतच नाहीं.

माझ्या माईचं तसंच झालं नसेल ना ?—ती पुण्यवान् !—म्हणूनच त्यानें तिला लौकर नेलं...

पण त्यांत माझा अभाग्याचा किती बरं तोटा झाला ?? मी मातृसुखाला कायमचा ...अगदीं कायमचा...मुकलों ! !...

आई !...तिची आठवण...तिची किंमत ! ती नसतांनाच ती खरी समजते !...आई असलेल्यांना नि असून नसल्यासारखं वागणाऱ्यांना तें काय सांगणार ?...

म. ग्रं. सं. ठाणे.
वा. क्र. ३५८९ नों.
क्र.




# —तुटलेली तारका!—

—१—

दिवसाढवळ्या चाललेला जगांतील व्यवहार सकाळपासून पाहून, सूर्यनारायणालाही लाज वाटल्यावांचून राहिली नाहीं. आधींच निस्तेज झालेलं आपलं तोंड त्यानें काळ्या ढगांच्या आवरणामागें झांकून घेतलं.

इतकंही करून बिचाऱ्याचं मन स्वस्थ होईना. शेवटीं वैतागून तशाच झांकल्या तोंडानें त्यानें पश्चिम डोहीं उडी घेतली; नी म्हटलं-" नको या जगाशीं संबंध..."

त्याची आत्महत्त्या कोणाच्याही मनाला चटका लावण्यास पुरेशी होती. पण कठोरहृदयी जगाला काय त्याचं ? तें जवळच्या ढगांनींच व्यापलं होतं ! ढगाबाहेर...दूरवर,...इळहळणाऱ्या लांबच्या तारकांच्या हृदयाची त्यांना काय कल्पना !

—२—

...तारकांच्या मनाची चलबिचल होत होती ! " हें जग ! हाय ! हें जग दुष्टांनींच गजबजलेलं आहे काय ?"...

छेः ! त्यांच्या कोमल मनाला तें असह्यच झालं ! त्यांना न कळत, त्यांच्या डोळ्यांतून खळकन् अश्रु गळाले...

पण ते अश्रू हें ओळखण्याइतकी सहृदयता जगांत कुठं होती ?...वर ढगांकडे पहात तें म्हणत होतं—" अरे पाऊस आला ! "

पण ज्याची भाषा त्यालाच समजते ! हृदयं सारख्याच दर्जाची असावीं लागतात दिलजमाईला !...

निसर्गाला मात्र तारकांची भाषा समजली !...त्यांच्या हृदयाची व्यथा त्याला जाणवली !...सारखे दुःखाचे निश्वास सोडूं लागला !...

पण स्वार्थातच रमलेले म्हणूं लागले, " काय वारा झोंबतोय अंगाला !"

...सर्व देखावा पाहून झाडांच्या अंगावर रोमांच उभे राहिले ! त्यांचे देह गदगदां हलत होते !...

पण जग स्वतःच्याच दृष्टीनें विचार करीत होतं–" अरे, काय झाडं हलताहेत आज ! पडेल एखादं कोसळून घरावर !..."

पत्तरांच्या डोंगरांचंसुद्धां हृदय आज द्रवल्याशिवाय राहिलं नाहीं ! विचाऱ्यांनीं रडून आकांत मांडला;...शेंवटीं रक्तवर्ण अश्रूही येऊं लागले...

"या गढूळ पाण्यानं नदी कशी फोंफावून चालली आहे !"...

ही–ही—जगाची दृष्टी !...कठोर हृदयी जगापुढं निसर्ग काय रडणार ??

पृथ्वीनेंही काळं वस्त्र परिधान केलं. तारकांच्या अश्रूंची माला चालूच होती; झाडांचं सळसळणं,...सर्व कांहीं तसंच चाललं होतं !...मधून मधून कडकडाट होई !...विज चमकून जगावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न करी; पण तो फोल ठरे !

—३—

ताराही रडत होती. घरामागच्या अगदीं एका बाजूच्या तुळशीवृंदावनाशीं ती केव्हांपासूनची उभी होती. शून्य मनानें ती चोहूंकडे पहात होती...जगावर अंधार पसरला होता; तसाच तिच्या हृदयांतही तो कोंदाटला होता.

तथापि आकाशांतील विद्युल्लतेप्रमाणें मनांत आशा चमकायची मात्र पूर्ण बंद झाली होती.

भोवतीं गडद काळोख झाला होता. बराच वेळ ती पावसांत उभी असल्यामुळें तिचं लुगडं ओलंचिंब झालं होतं. पण त्याचं तिला भानही नव्हतं...

तिचं अंतरंग पेटलं होतं. त्यामुळेंच पाण्याचा तिला भासही होत नव्हता !

साधी खेडवळ पोर ती !...नाहींतर तिच्या मनातील प्रश्नांना, जातां जातां सूर्यानें दिलेलं उत्तर समजावयास उशीर लागता ना ...

सरलमनस्क तरुणी ! आपल्या मनाचं रडूनच सांत्वन करीत होती.

हिंदु अबला दुसरं काय करणार ?

—४—

हो ! पण ठरलाच तिचा शेवटीं निश्चय !!...एक दोनदां शहारल्यासारखं केलंन् !...पण नंतर लगेच चालायला लागली ! ..

तिनें एकदां सभोंवर चोरट्या नजरनें पाहीलं. सर्व माणसं घरांतच होतीं. त्या पावसापाण्याच्या काळोख्या रात्रीं तारेसारख्या दुर्दैवी स्त्रीशिवाय कोण कशाला मरायला बाहेर पडणार ??...

हो, पण तारा त्या रात्रीं मरायलाच बाहेर पडली होती !...कारण ?...तिला जगणं असह्य झालं होतं;...परंतु त्याचीही बिचारीला चोरीच !...

काळोख किनाट होता !...पाऊस झिमझिम पडत होता !...

तारेनें हिय्या करुन झपझप पावलं टाकावयास सुरवात केली. ढोंपराएवढं वाढलेलं गवत तुडवीत ती चालली होती; त्याचा मधूनच आवाज येत होता...

तिच्या हृदयाचाही भयानक धडधडाट चाहूल घेतल्यास ऐकूं येता !—

...वारा व त्याच्याच जोरावर पाऊस...दोघेही तिच्या अंगाशीं झोंबत होते. पण त्यांची तिनें पर्वा केली नाहीं!...

जातां जातां गवतांतून कांहीं सरपटत गेल्याचा आवाज तिच्या कानीं पडला! पण त्याची तिला मुळींच फिकीर नव्हती...ती थेट एक कुंपण, दुसरं कुंपण, करीत काट्याकुट्यांची, खड्यांची, कशाचीहीं पर्वा न करतां भराभर जीव हातांत घेऊन चालली होती.

भुतांखेतांची खंत बाळगावयास ती नेहमीची तारा राहिली नव्हती! तिच्याच अंगात आज भूत संचारलं होतं.

मनांत चाललेल्या विचारामुळें शरिराची तिला काळजीही नव्हती!

त्या शरिरालाच मुळीं ती कंटाळली होती...

—५—

शेवटीं तिला पाहिजे होतं त्या ठिकाणीं ती आली.

तो अगदी निर्जन प्रदेश होता. रातकिडे 'किर्र किर्र' करीत होते! 'बेडकांचीं लग्नं' चाललीं होतीं!......

लांबून येणारं कुत्र्याचं भुंकणं, आपण वस्ती सोडून बरंच लांब आलों, असं तिला दर्शवीत होतं; !...त्यांतच पावसाच्या सरीचा मंद मंद आवाज!...

गवत फोंफावून छातीएवढं वाढलं होतं,... थंडीनें कुडकुडून झाडं अंग झाडीत होतीं; त्यांचा सळसळ आवाज येत होता.

गवतामध्यें लपलेल्या त्या पडक्या (धक्का नसलेल्या) विहिरीकडे तिनें अतिशय आशाळभूत नजरेनें पाहिलं!

पण तिला समोरच्या पाण्यामध्येंहि काळोखाचं प्रतिबिंबच दिसत होतं...

ती तसं पहात होती, इतक्यांत एका बेडकानें पटकन् तिच्या पायावर उडी मारली!...तिचं अंग थरारलं! ती मनाचा निश्चय करुन आली होती;... पण क्षणभर तिला मोह वाटल्यावांचून राहिला नाहीं...

ती एकदम भानावर आली. "लवकर आटोपून टाकलेलं बरं! नाहींतर कांहीं नसतं विघ्न उपस्थित व्हायचं!"

–६–

तिनें विचार करीत सभोंवार कोणी नाहीं अशी खात्री करून घेतली!...

लुगड्याचा ओचा नीट खोंवून पदर कमरेभोंवतीं घट्ट गुंडाळला! आंबाडा घट्ट आवळला! बांगड्या मनगटावर चढविल्या!!...न जाणों,...वेळींच आवाज होऊन कोणी तरी धांवून यायचं!...

पण छे! अजून तिचं समाधान होईना! तिनें जवळचाच एक भला मोठा धोंडा आपल्या पदरांत घट्ट आवळून बांधला!

...ती विहिरीच्या काठांवर उभी राहिली!...वर पाहून तिनें हात जोडले– "देऽवा!..." पण तिच्या कंठातून पुढील शब्द बाहेर पडेचनात!......

ती रडूं लागली...पाऊसही जोरानें पडूं लागला...

तिच्या उरींच्या दुःखाच्या उष्ण उसाशांशीं प्रेमळ गार वारा 'सों सों' शब्दानें सहानुभूती दाखवीत होता!

विहिरींतील पाण्याकडे खालीं एकदां पाहून तिनें वर दृष्टि फिरविली. हात जोडून तिनें अश्रूंचा पूर चाललेले आपले डोळे मिटले!..."देऽवा! मी असं काय गेल्या जन्मीं पाप केलं होतं रे!...कधींही प्रेमाचा शब्द म्हणून मला कसा तो ऐकावयास येऊं नये ना?"

तारेच्या कोमल–अजून जिवंत असलेल्या–हृदयाच्या चिंधड्या होण्याची पाळी आली!...

अश्रूंचा पाऊस चालला होता!... छातीचा भाता वाजत होता!

गरीब बिचारी! प्रेमळपणाची मूर्तीच होती! पण निर्दय जगाला तिची काय कल्पना?...

तिच्या अश्रूंनीं डबडबलेल्या डोळ्यांत बघतां बघतां भूतकालांतील अंधुक चित्रं गटंगळ्या खाऊं लागलीं....

चित्रपटाप्रमाणें तीं सारीं सरसर पुढं चालली होतीं...

—७—

परकरी पोर असतांनाची तिची पहिली आठवण !...

"बाळ झालं ! आईला बाळ झालं !" म्हणून नाचत बागडत शेजाऱ्यांकडे हिंडणारी स्वतःची अस्पष्ट आकृति तिच्या डोळ्यांसमोर आली ! तशाही स्थितींत तिला आनंद झाला.

खरंच, त्या वेळींचं न् आतांचं जग निरनिराळं का ?...

पण लागलीच तिला दोन दिवसानंतरची, आपल्या आईची बिछान्यावर स्वस्थ पडलेली निश्चल मूर्ती दिसूं लागली ! त्यावेळीं ती काय भानगड होती,..तें तिच्या बालिश मनाला समजलंहि नव्हतं;...आतां मात्र त्या प्रसंगाची आठवण होऊन तिला रडूं कोसळल्यावाचून राहिलं नाहीं...

"मेली तें काय वाईट झालं ?...जगून तरी आमच्या सारख्यांनीं काय मिळवलं ?" तिच्या मनांत विचार आले.

त्यावेळीं तिचा आतेभाऊ अण्णा कधीं कधीं त्यांच्याकडे येत असे. त्याचीही तिला अंधुक आठवण झाली...

साऱ्या अंगातून एखादी लाट गेल्यासारखं होऊन तिचं शरीर हादरलं !

—८—

यानंतर सात साडेसात वर्षांनंतरचा प्रसंग तिच्या डोळ्यासमोर आला...

होय, तो तिचाच लग्नसमारंभ होता...

नुकतीच ती साडी नेसूं लागली होती;...नव्या साड्या नेसून दोन दिवस इकडे मिरवण्यास मिळालं यापेक्षां तिला त्यावेळीं लग्नाचं जास्त

महत्व वाटलं नाहीं;...लहानपणीं आपल्याकडे कधीं मधीं येणारा आपला आतेभाऊ अण्णाच आपला नवरा होईल असं तिला वाटलं नव्हतं!...

(पण या गोष्टींचा लहानांनीं कां विचार करावा ?...वडील माणसांपेक्षां काय त्यांना जास्त कळतं ?...तिच्या बाबांनींच तें लग्न ठरविलं होतं!)...

अण्णा व्हर्न्याक्युलर फायनल नापास झाला होता;...कोंकण सोडून त्यानें मुंबईच्या जवळपास लहानसा व्यापारधंदा उभारला होता...

बाबांना आपल्या भाच्याचं स्थळ बरं वाटलं !...अण्णाच्या आईनेंही भावाच्या मुलीला होकार दिला...

मग आणखीं काय राहील ?

झालं ! तारेचं लग्न झालं !...

आतेची सासू झाली !...इतके दिवसांचा आतेभाऊ अण्णा– (आतां त्याचं नांव कसं घ्यायचं)...' नवरदेव ' झाला ! !– लहानपणीं बरोबर खेळलेली माई आतां तिची नणंद झाली !

माई विधवा असल्यामुळें माहेरींच असे !...

आणि नातीं बदल्यावर वागणुकींतही फरक झाल्यावांचून राहिला नाहीं...

अन् हें तारेला समजावयासही फारसा वेळ लागला नाहीं.

–९–

आतेचा सासूबाईपणा...प्रथम प्रथम तिला जरा चमत्कारिक वाटे; पण नंतर तो तिच्या अंगवळणीं पडूं लागला....

परंतु बालपणींच्या मैत्रिणीची नणंदगिरी तिच्या प्रेमळ खुल्या हृदयाला असह्य होऊं लागली !...

वैधव्य आल्यापासून माईचा स्वभाव पार बदलला होता !...दुसऱ्याचं सुख तिला पहावत नसे !...

आपल्या वहिनीच्या मनाला व शरिराला होईल तितका त्रास द्यावयाचा जणूं काय तिनं विडाच उचला होता !...

तारेला समजूं लागलं तसतसा तिचा नवऱ्याविषयींचा आदर वाढूं लागला!..

पण अण्णाचा स्वभाव कांही औरच !......एककल्ली, हट्टी, तुडस, कानपिसाट...तारेच्या अगदीं विरुद्ध !...

त्या सरळ हृदयी बालिकेला तें कसं खपणार ?

तिला खुल्या अंतःकरणानें आपल्या पतीबरोबर दोन शद्ब बोलावेत, असं वाटे! पण आपल्यांत साधारणतः, मुलाचं लग्न करुन सून आणावयाची ती घरकामाकरितां...राबायला अशीच समजूत झालेली असते कीं काय न कळे! जणूं काय नवऱ्यापेक्षां त्याच्या अवांतर नातलगांसाठींच तिची घरांत जास्त आवश्यकता !

अन् तारा त्याला तरी कुठं नाकबूल होती. सासूबाईचं प्रत्येक काम तिनं मोठ्या आनंदानें केलं असतं ! तसं कां ? करीत होती कीं !...सर्वांची कामगिरी करावयास ती तयार होती !...अगदीं मोलकरणीसारखं काम केलं असतंन् !

पऽण...पण...तिला प्रेमाचा शद्ब पाहिजे होता.

पतीच्या दोषांकडे दुर्लक्ष करावयाचं 'आमच्या आर्य स्त्रियांना' जन्मतःच माहीत असतं !...तो दोष असो, गुण असो, तारा त्याच तऱ्हेचा होती.

अण्णाबद्दल किती बऱ्यावाईट गोष्टी तिच्या कानांवर आल्या. पण त्याबद्दल ती चकार शद्बही काढीत नसे.

...फारच असह्य झालं म्हणजे आपल्याशींच बसून तारा मनसोक्त रडे !

—१०—

घरांतलं कोणी नाहीं पण शेजारचा रमेश मात्र तिच्याबरोबर अगदीं प्रेमळपणें वागे !...आपलं सगळं हृद्गत मोकळ्या मनानें सांगण्यास त्याच्याशिवाय तिला जगांत दुसरं स्थान नव्हतं.

तोही तिचं दुःखी मन आपल्या प्रेमळ शद्बांनीं शांत करी !...एकाच वयाचीं होतीं दोघं !...अन् स्वभावही समान असल्यामुळें त्याचं मेतकूट फारच लवकर जमलं !—

वर्षांतून येणाऱ्या कॉलेजच्या दोन सुट्यांच्या आशेवर तारा सर्व दुःख विसरण्याचा प्रयत्न करी !...त्याच्या सुटींतील येण्याची ती अगदीं उत्कठेनें वाट पाही !—तो तिला अगदीं जवळच्या नातलगासारखा वाटे !...

बिचारीला भाऊ नव्हता त्याची जागा त्यानें भरून काढली होती...

रमेशला त्या निष्पाप बालिकेचे हाल पहावत नसत;...आपल्यामुळें तिच्या मनाला कांहीं दिवस कां होईना विरंगुळा वाटतो म्हणून तो सुट्टीत कधींही दुसऱ्या गांवीं जात नसे !...सुट्टी पडल्याबरोबर दुसऱ्याच दिवशीं तो थेट आपल्या खेडेगांवीं हजर होई !...

तो आल्याची बातमी समजतांच तारेला किती आनंद होई !... तिचा नेहमीचा खिन्न व निराश चेहरा थोडासा फुले !...क्षणभर तिला वाटे जगांत अजून आपणास रहावयास हरकत नाहीं !...

## —११—

...पण तेंहीं सुख तिला मिळावं अशी कोणाची इच्छा दिसेना !...

माईसाहेबांनीं हळूहळू आपल्या वहिनीविषयीं फूत्कार सोडावयास सुरवात केली !...सासूबाई सभ्य टोमण्यानें बोलूं लागल्या !... अण्णा जातां येतां तारेवर आपले डोळे काढूं लागला !...

दुष्ट मनांत दुष्ट विचार शिरावयास व रुजावयास वेळ लागत नाहीं !...

सगळीकडे बोलबाला होऊ लागला तेव्हां रमेशला वाईट वाटलं !...त्याचं जाणंयेणं, तारेशीं बोलणं, सर्व एकदम बंद झालं !—

बिचारी तारा ! सर्व दिवसभर काम करून थोडक्या विश्रांतीसाठीं मिळणाऱ्या रात्रीं सारख्या रडून घालवूं लागली !...

अण्णाविषयीं किती खात्रीलायक कुवार्ता तिच्या कानीं येत ! ! त्यावेळीं तिला वाईट वाटत नसे असं नाहीं !...

पणऽ...पण तो पुरुष होता ना !

अन् प्रेमळ रमेशशीं आपण जरा अघळपघळ बोललों तर काय हा विपरीत अर्थ ?...जगांत सगळीकडे दुष्टपणाच भरला आहे काय ? तिचं मन अगदीं सुन्न होऊन जाई ?... तिचं प्रेमळ हृदय फाटून जाण्याच्या बेतांत येई !...

पण तरीही ती कसं बसं सोसून राही !...तिला तिच्या नवऱ्यानें शद्बानें कधीं दुखविलं नव्हतं !

कधीं तरी आपलं नशीब फळफळेल असं तिला अजून वाटत होतं !...

पण तीं तिची आशा व्यर्थ होय हें तिला आजच समजून आलं !...

## –१२–

पांच वर्षं गेलीं होतीं ! घरांतील पोशी मोलकरीण यापेक्षां तारेची योग्यता सुधारली नव्हती !...फुकाचं समाधान तर राहोच, पण...तिच्या कोमल हृदयाला थडाथड धक्के देणाऱ्या गोष्टी तिच्या डोळ्यांसमोर घडत असत !

आपल्या पतीविषयीं आणखी पुष्कळ माहिती तिच्या कानीं आली; पण–

सासूबाईंचा व माईचा क्रम मात्र तसाच चालू होता. पण सर्व सहन करणं तारेच्या आतां अंगवळणीं पडलं होतं–

तिचं लग्न अण्णाशीं झालं होतं;...पण खरं पहातां तें सासूबाईशींच झालं होतं असं म्हणायला हरकत नाहीं !...

अण्णा तिच्याबरोबर लग्नापासून कधीं प्रेमानें एकादा शब्दही बोलला नव्हता !...

पण तो तिला कधीं वांकडा शब्दही बोलला नव्हता एवढ्याच समाधानावर ती जीव धरून होती !...त्यावरच ती सर्व सहन करीत असे.

पण तेंही नाहींसं झालं!...शेवटीं एक दिवस उगवला. आणि त्याच्या अस्तापूर्वी तारेच्या मनांतील उरलासरला आशासूर्यही मावळला.

आशेचा शेवटचा धागा तटकन् तुटला! ती निराशेच्या दरींत पडली!

-१३-

साधी गोष्ट!...तिच्या वन्सं तिला नेहमींच्या पद्धतीप्रमाणें कांहीं बोलत होत्या!...सासूबाईनींही मध्येंच त्याला दुजोरा दिला!...बिचरीनें बराच वेळ सहन केलं!...पण तिला आज तें विनाकारण बोलणं सहनच होईना...तिला रडूं कोसळलं...

" मरेन तेव्हां सुटेन एकदांची!...नको झालाय् हा जीव अगदीं!"... ती वैतागून एकदम मोठ्यानं रडकुंडीला येऊन म्हणाली...

अण्णा बाहेरच्या खोलींत होता...त्याच्या कानीं ते शद्ब गेले...

तो झटकन आंत आला...एकदम तारेपुढें उभा राहून त्यानें तिच्या थोबाडींत मारली..." शिंची उलट उत्तरं देते?...नकोसा झाला असेल तर दे जीव न् हो मोकळी! उगाच धमकी कशाला?...असा जीव वर येतोय् होय कोणाचा?"

आपल्या आईचं समाधान झालेलं पाहून त्याला बरं वाटलं.

आपल्या माईचा आनंदी चेहरा त्याला दिसला!...

आणि तारा!!...तडख एका खोलींत जाऊन आंतून कडी घालून बसली. तिला झाला प्रकार खराच वाटेना!...तिनें गार जमिनीवर आपलं कढत अंग टाकलं; पण तिचं भडकलेलं मन शांत होईना.

" अरेरे, स्वतः येऊन माझ्या अंगावर हात टाकावा ना!...ईश्वरा, आतां मी हें सहन तरी कसं करूं? जगांत राहून तरी काय करायचं?...कोणाला माझी पर्वा आहे?"......तिच्या डोळ्यांतून घळघळां अश्रू वाहूं लागले!... प्रेमळ शद्बानें सांत्वन करणारं कोणींच जवळपास नव्हतं...

तिचं मन शांत होईना ... विचारीची शेवटची उरल्या आशेची जागा आज पुरी नाहीशी झाली.

## –१४–

तारा त्या संबंध दिवसांतून खोलीबाहेर पडली नाहीं!...

पाणी, अन्न कशाचीही तिला आवश्यकता वाटत नव्हती!...तिला प्रेमाची जरूर होती!...आणी तें तर तिला जगांत कुठंच सांपडलं नव्हतं!...

तिची सबंध रात्र तळमळून निघाली. सकाळींही ती जेवली नाहीं...पुढला सबंध दिवस विचारांत गेला; तिचा शेवटीं विचार ठरला.

संध्याकाळच्या सुमाराला ती खोलींतून बाहेर पडली; माई उपहासानें हंसून हळूच म्हणाली " किती दिवस ही चाळे करणार अशी?"

स्वतःपेक्षां तारेलाच ऐकविण्यासाठीं होते ते शद्व!

तारा तुळशीवृंदावनाशेजारीं हिरव्या गवतांतच उभी होती;...तिच्या अंतःकरणांत त्या शद्वांनी वणवा पेटला होता;...डोळयांतून अश्रू चालले होते.

तिच्या प्रेमळ हृदयाला जगांत आतांपर्यंत प्रेम सांपडलं नव्हतं;...दुसऱ्या जगांत तरी मिळेल का, हा प्रश्न सोडविण्याचं तिनें ठरविलं...

आणि शेवटीं तिचा निश्चय ठरला!

## –१५–

तारा त्या काळोख्या विहिरीच्या कांठावर उभी होती.

तिच्या डोळयांपुढून भरभर हे सारं प्रसंग येऊन गेले!

ती पुन्हां भानावर आली...तेव्हां पाऊस झिरपतच होता...तिचा अश्रुप्रवाह चाललाच होता...

तिनें खालीं विहिरीच्या पाण्याकडे पाहिलं...ती जरा चमकली!

सभोंवारचा काळोख तिच्या मनाला थोडा हदरवीत होता.

इतक्यांत कुत्र्याचं भुंकणं तिला जवळपास ऐकूं आलं !—" बाईऽ ! नको उगीच उशीर ! मग आणखी सगळंच फसायचं !...

ती जिवाला—नव्हे शरिराला—अगदीं कंटाळली होती !

तिनें पुन्हां सर्व नीट पाहिलं. छातीचा दगड घट्ट केला...छातीही दगडासारखीच घट्ट केली..." कंटाळा आला या जगाचा !...तुझ्याकडंच येतें आहे मी आतां !"

तिनं वर पाहून ईश्वराला हात जोडले.

आणि....आणि......तशा स्थितींतच विहिरीच्या बाजूला आपला झोंक वळविला...

—१६—

गडगडणाऱ्या आकाशांत त्याच वेळीं मोठा कडकडाट झाला !..आणि त्या आवाजांत तारेचं शरीर पाण्यांत पडण्याचा आवाज साफ विलीन झाला !...

दगडानें तारेला बरीच मदत केली...तारेचं शरीर पाण्याखालीं गेलं तें पुन्हां वर आलंच नाहीं !...

माणसांपेक्षांही त्या दगडानें तिच्याबद्दल जास्त प्रेम दाखविलं !...

पुन्हां एक गडगडाट झाला...व नंतर त्या काळोख्या विहिरीवर चक्कन एकदां वीज चमकली !...

त्या उजेडांतच विहिरीच्या पृष्ठभागीं बुडबुडे येतांना दिसले !...

जणूं काय तारेची जीवनज्योतच तिच्या शरीरांतून बुडबुड्यांच्या रूपानें वर येऊन चमकून आकाशांत नाहींशी झाली !...

मग विहिरींतील पाणी पुन्हां निश्चल झालं ! पुन्हां पूर्वींप्रमाणेंच भोंवतीं शांतता पसरली !—

रातकिडे ' किर्र ' करीतच होते ! बेडकांचं लग्नही तेवढ्याच जोरांत लागत होतं !...कुत्रींही पूर्वीप्रमाणेंच रडत—ओरडत होतीं !...

तारेच्या जीवाला आतां तरी आनंद मिळाला असेल काय ?

कोणास ठाऊक ?...विचारणार कोणाला ??....

## —१७—

" अगबाईऽ ! तारा कुठं ?" सासूबाईच्या छातींत धस्स झालं !...

माईही कावरी बावरी झाली !...ती अण्णाकडे धांवतच गेली...

अण्णाचं धाबं दणाणलं...त्याच्या मनांत शंकाकुशंका येऊं लागल्या !...

' कालच्या प्रसंगामुळें खरोखरच कांहीं बरं वाईट झालं नसेल ना ?'

' काय पोरीनं केलंन् कोणास ठाऊक ?... आतां अब्रू जायची पाळी आली !' आमची अण्णाची आई कपाळावर हात ठेऊन बसली.

" रमेशचा हात धरून..." त्याही कल्पना त्यांच्या डोक्यांत आल्यावांचून राहिल्या नाहींत !...

' खरोखरीच तिनं जीव दिला असेल तर फौजदारापर्यंत भानगडी जाऊन अब्रूवर शिंतोडे उडतील !' याचीच अण्णाला जास्त काळजी लागली होती...

## —१८—

वार्तांच ती !...भरूकन् जवळपास पसरली !...

कंदील, सोटे (?) सर्व घेऊन तपास सुरू झाला...सर्व विहिरी धुंडाळल्या. आसपास सर्वांच्या घरीं विचारपूस केली...जवळपासच्या स्टेशनावर कसून चौकशी झाली !...

पण तारा लपली होती तें ठिकाण कोणालाच सांपडलं नाहीं !!...

दुसऱ्या दिवशीं पोलीस अधिकारीहि आले ..जवळपासची शिष्टमंडळी मध्यें पडली; तेव्हां कुठं त्यांची बरीच समजूत झाली !...

मांत्रिकांना प्रश्न विचारण्यांत आले !...प्लँचेटचे प्रयोग करण्यांत आले... ज्योतिषांनीं कुंडल्या मांडल्या !...

कांहीं 'ती जिवंत आहे' असं सांगत! कांहीं 'ती मेली' असं सांगत !!... निश्चित कांहींच होईना...

चौथ्या दिवशीं तपासावर असलेल्या कांहीं गडी माणसांकडून सकाळींच माहिती मिळाली...

'जवळच्याच विहिरींत एक प्रेत तरंगत आहे.'

तत्काळ,...पोलीस आले—डॉक्टर आले !

गड्यांना बक्षिसी ठरल्यावरच त्यांनीं प्रेत बाहेर काढलं...

## –१९–

त्यांच्याकडे बघवत नव्हतं...पाण्यामुळें तें भयंकर फुगलं होतं...

तोंडाचा जबडा दुप्पट मोठा दिसत होता...तोंड निर्विकार होतं...ओंठ घट्ट केलेला होता...पदर घट्ट खोंवला होता; हाताची घट्ट मिठी मारलेली दिसत होती...(कदाचित् दगड सुटूं नये म्हणून तो तिनें घट्ट धरलेला असावा) ...बांगड्या मासांत रुतल्या होत्या...तें दृश्य पहावत नव्हतं...दुर्गंधी अतिशय सुटली होती...

आधीं जगानें ठरवलंच होतं ! तेव्हां डॉक्टर–अधिकाऱ्यानींही 'आत्महत्या' असा निर्णय दिला ! !....त्या निर्णयानें सर्वांचे जीव भांड्यांत पडले...

कोणीही प्रेत उचलावयास तयार नव्हता !...गाडींतून—बैलाच्या गाडींतून —तिला नेण्यांत आलं !

त्यामुळें तारेला खरोखर आनंद झाला असेल!...

'अहाहा! माणसांपेक्षां बैलांच्या पाठीवरून आपलं शरीर नेलं गेलं!...'

कांहीं भानगड झाली नाहीं म्हणून सर्वांना हायसं वाटलं

तारेच्या अस्थि स्वतः तीर्थक्षेत्रावर नेण्याचं पुण्य अण्णा व त्याची आई यांनीं मिळवलं!...माईही सर्व विधी यथासांग व्हावेत म्हणून त्यांच्याबरोबर पवित्र क्षेत्रीं गेली होती!

आणि मग...जगाप्रमाणेंच अण्णा वगैरेंचा व्यवहार पुन्हां सुरळीत चालूं लागला...

—२०—

अशा किती तारा ढगांमधें लपलेल्या असतील!...किती तुटून पडत असतील??...पण निष्ठुर जगाला त्याची काय पर्वा??

...आणि म्हणूनच जग अव्याहत चाललं आहे!!...

[ ७ ]

## — कालिंदी —

## '—तोच इतिहास ?—'

—१—

रामभाऊंनीं चिंतामुक्ततेचा एक लांबलचक सुस्कारा टाकला !...

जगांत त्यांच्या घरीं एक प्राणी नव्यानेंच अवतरला होता ! !...

चोहूंकडे सगळंच नवीन पाहणाऱ्या त्या बालमनानें, 'कुठं पाहूं न् कुठं नको' हा प्रश्न सुरवातीस न सुटल्यामुळें, डोळे बंद करूनच, ' क्यॅऽ ह्यँऽऽऽ...' अशा शद्बांत आपल्या हतबल स्थितीचा कबुलीजबाब दिला !

आईला पटकन् प्रेमाचा पान्हा फुटला......

बायकांचा गलबला सुरूच होता !...

" सुरक्षित मोकळी झाली; बरं झालं ! पण या बयेसाठीं आतांपासूनच हुंडा तयार करून ठेव रेऽभाऊ !...नाहीं तर स्वत: गहाण रहाण्याचीच बापाला पाळी !!" भाऊंच्या आईच्या तोंडचे, हळू हळू पुटपुटलेले व्यवहारी उद्गार !...

—२—

त्या दिवशीं देवाला अंघोळ घडली नाहीं !...भिकाऱ्याला ' सुवेर ' म्हणून सांगत !...कांहीं दिवस असेच चालले होते ! !...

( तोंपर्यंत तरी देवाची न् भिकाऱ्यांची ब्याद गेली होती पाठची !.... )

रीतीप्रमाणें ' पांचव्या ' ' सातव्या ' सर्व झाल्या !....( जनरूढच ती ! )

म्हणे—' सटवाई आली न् तिनं पोरीच्या ललाटी आडव्या उभ्या रेघोट्या ओढल्या !' तिचं नशीबच त्या दिवशीं ठरून गेलं ! !

काय तें जाणत्या स्त्रियांना ठाऊकच होतं!—'बायकांचा जल्म तो काय असणार आणखी? मरेपर्यंत मरमर मरायचं! नि अखेरहि एकदां मरायचंच !..'

'सुवेर' संपलं! बाळेचे नाक कान टोंचले;...चार बायका जमल्या; झबलीं टोपरीं घेऊन!...

(कांहीं जुनी उसनवार फेडायला; कांहीं 'चाल आहे' म्हणून आपल्या बडेजावासाठीं नवीन वाण सुरू करायला!!...)

त्या नवीन बालेला नवं झबलंटोपरं चढलं!...पाळण्याला पाठीनें झोंके मिळाले; तिच्या चिमुकुल्या तोंडांत एक चिमूट साखर पडली!!

सुवासिनींचा एकच गलबला सुरू झाला!....

विधवाहि आंतून डोकावून पहात होत्या!!....

शेवटीं, त्या दिवसापासून ती लहानगी बाला, कालिंदी या नांवानं जगांत ओळखली जायचं ठरलं!...

## -३-

कालिंदी दिसादिसानें वाढत होती!...तिच्या दृष्टीनें जगाचं नि जगाच्या दृष्टीनें तिचं स्वरूप पालटत होतं!...

मग हातापायाची गाडी थांबली! मुठी सैल झाल्या!...दृष्टि स्थिर होऊन बघूं लागली!...हळू हळू 'पाय फुटले'; 'अऽन्नाऽ!' 'ताऽत्ताऽ!' सारखे शब्द येऊं लागले! झबल्याचं हळू हळू फ्रॉकमध्यें रूपांतर झालं;..फ्रॉकनंतर परकरपोलका!..

पण मुलीचं कुठचं फारसं कौतुक व्हायला? ('मुलगा असता तर—')

तीच स्वतः आपली जास्त करमणूक करून घेई!... (या कामीं लांकडी 'ठकी'-बाहुल्यांची तिला बरीच मदत होई!!..)

कालिंदीच्या निर्मल मनांत अजून आंतबाहेर मुळींच नव्हतं!

जगाचा दांभिकपणा जगांत वावरूं लागल्यावरच येतो अंगांत!!

मागचा भाऊ व स्वतः, यांच्याबद्दलच्या प्रेमांतील वडील माणसांचा पक्षपात पाहून मात्र, सुरवातीस कालिंदीच्या सरळ मनाला आश्चर्य वाटे !—

" त्यानं खाल्लं जास्त म्हणून काय झालं ?....त्याचा तो हक्कच मुळीं !... तुम्ही उद्यां उठाल न् जाल नवऱ्याच्या घरीं !...आहे काय तुमचं या घरांत, मेल्यांऽनों ! ! "

हा ' श्री, ग, णे, शा,...' प्रथम प्रथम त्या बालिकेला समजण्यास अवघड वाटे; पण मग तें तिच्या अंगवळणींच पडलं !

आणि तिला खात्रीपूर्वक वाटूं लागलं शेवटीं–' खरंच; आपलं कांहींच नाहीं या घरीं बरं ! ! '......

## –४–

' हल्लींच्या नवऱ्यांना बायका शिकलेल्या लागतात !' ' दुसरे सभोंवारचे चारचौघेही मुलींना शिकवतात !'

आणि म्हणूनच कालिंदीहि शिकत होती !!...

बाकी घरांतल्या कोणालाच काय, पण तिचं तिलाही ती कशासाठीं शिकत आहे तें समजत नव्हतं !...

पास होईपर्यंत त्या वर्गात; पास झाली कीं त्याच्या पुढील !!...

' करायचंय् काय मुलींनीं जास्त शिकून ??' असं सर्वांनाच वाटे. " नवऱ्याला काय पुस्तकांची भाजी करून घालणार आहे ? पण आपला जनापवाद नको उगीच आपल्याविषयीं;...एवढंच..."

आणि म्हणूनच कांहीं वर्षं तिच्या शिक्षणाची अशी चालढकल झाली !...

## –५–

परकर पोलक्याबरोबर कालिंदीचे बाहुलाबाहुलींचे खेळ गेले !

तिला आतां निर्जीव बाहुल्या नि, जिवंत चालतींबोलतीं माणसं यांतला फरक समजूं लागला होता!!...

तिचा निर्मल चेहरा बराच बदलला होता! शांत डोळे तरळ झाले होते; तिला अलीकडे कांहीं तरी चुकल्या चुकल्यासारखं वाटे...काय तें तिला समजत नसे; पण कांहीं तरी नवीन आहे याची तिला पूर्ण जाणीव झाली होती.

'लहान का तूं आतां ? लाज कशी नाहीं वाटत, घोडेऽ ?!...'

"खरंच !...आपण आतां लहान नाहीं!" असंच तिला अखेर वाटूं लागलं; आणि त्यामुळें मधून मधून येणाऱ्या अल्लडपणाच्या लहरी ती अलीकडे आंतल्याआंत दाबी!!...

...पोलक्यासाडींतील कालिंदी तीच!...पण तिला कृत्रिम जगाची आतां तर बरीच ओळख झाली होती!

आतां, तिची पूर्वीप्रमाणें प्रत्येक कृति स्वतःसाठीं होण्यापेक्षां सभोंवारचे चार-चौघे काय म्हणतील, या दृष्टीनें होत असे!...

पूर्वीची बालिश कालिंदी आतां पुन्हां कुठची दिसायला ? ?...

—६—

हे चमत्कारिक नवख्या उत्कंठेचे दिवसही गेले!...

अन् मग 'आज' म्हणून एक दिवस उजाडला!!

कालिंदी आज अस्वस्थ दिसत होती! पण चेहरा नेहमींपेक्षां जरा जास्त तेजस्वी दिसत होता!...डोळे बरेच तरळ झाले होते!...चेहऱ्यावर चोंहीकडे लाज फांकली होती!...गाल बरेच आरक्त झाले होते!!...

कधीं नव्हती, ती रामभाऊंनीं तिला नाटकाला नेण्याचा आजच योग आला!

सुधाकरला सोडून माहेरीं जाण्यासाठीं निघतांनां सिंधू पुन्हां दोनदां निरोप घ्यायला परत आली! किती प्रेम दोघांचं एकमेकांवर!...शेवटीं सुधाकर, यत्नाच कराची म्हणून, सिंधूला म्हणाला—'मला एकाद्या बोर्डिंगांत ठेव!'

११।१५

कालिंदी खद्कन् हंसली !...कां कोणास ठाऊक ? तिच्या हृदयांत एकदम चमत्कारिक गुदगुल्या झाल्या !!...

कालिंदीला, अंकामागून अंक, सुधाकर सिंधू वगैरे पात्रांबरोबर नेत होते ! ...पण पुढं तिचं लक्षच लागेना तिकडे !

नाटक कसंबसं संपलं एकदाचं ! आणि त्याबरोबरच त्याचा शेवटचा भयंकर अंक !

...तरी कालिंदीच्या हृदयावर मात्र पहिल्या अंकाचे पहिले कांही प्रवेशच अजून आपला ताबा चालवीत होते !

—७—

पऽण ..पण इतक्यांत तिच्या अंगावर एकदम रोमांच उभे राहिले !... एक चमत्कारिक लहर तिच्या शरिरांतून गेली !

त्याच वेळीं तिच्या आयुष्यांतील, एक मोठा फरक...एक महत्वाचं स्थित्यंतर घडून आलं !!...

तिला वाटलं, सभोंवारच्या सर्व लोकांना समजलं...

ती एकदम अतिशय लाजली !!...चालतां चालता तिची मान साहजिक खालीं गेली; तिनें झटकून् पदर सांवरून घेतला !...

तिच्या मुखकमलावरचा रक्तिमा बराचसा लाजेनेंच ग्रासला होता !!...

घरांतील इतर माणसं, पाहिलेल्या नाटकाविषयीं बोलत होतीं !...

पण कालिंदीचं लक्ष आपल्या आयुष्याच्या नाटकांतील त्या दिवशीं नवीनच उघडलेल्या अंकाकडेच लागलं होतं !!...

घरीं येतांच ती सर्वांना टाळून पळाली; अन् एका काळोखाच्या खोलींत शिरली !...तिला वाटलं काळोख तरी आपली लाज राखील. कांहींच न समजून ती उशींत डोकं खुपसून मुसमुसूं लागली.

लाजेनें तिला मानेपर्यंत गिळाली; म्हणूनच तिनें तोंड गुडघ्यांत लपवलं !

पण ती स्वतःच्या माथीं मारून घेत असलेला 'अपराध' निसर्गानें घडवून आणला होता !...

—८—

बराच वेळ झाला तरी कालिंदी कुठं दिसेना; म्हणून आजी शोधूं लागल्या !

इतक्या अनुभवीच त्या;...पोरीचा एकंदर आजचा नूर पाहून त्यांना [illegible] होता——

'कां ग काळोखात ?'...असं म्हणत त्या तिच्याजवळ जातांच ती लांब सरली; नि मुसमुसून रडूं लागली !...

...आणि त्या तिच्या रडण्यांत खूप खोल अर्थ भरला होता !

त्यांत दुःखापेक्षां सुखाचाच अंश जास्त होता ! किंवा सुखदुःखाचा गोंधळ..

"अस्संऽ ! तरीऽच्च ! अरे भाऊ, तुला बाबा, मुका नातू झाला रेऽ आज !" रामभाऊंची आई त्यांना हंसत हंसत सांगूं लागली !

—९—

जनरूढीप्रमाणें आजींनीं रांगोळी काढून, तेवत्या समईसमोर कालिंदीला गोडधोड वाढलं; तीनचार दिवस असंच झालं !

...आणि मग नवीन गोष्ट जुनी झाली !

नव्या काळाप्रमाणें, यानंतरही कांहीं काळ——चारचौघांत फारशी चर्चा होत नाहीं म्हणून—कालिंदी अविवाहित राहूं शकली !

आपण कोण...आपल्या आयुष्याचा हेतू काय, वगैरे स्वतःच्या सर्व इच्छा आकांक्षा, तिला अंतःस्फूर्तीनें चांगल्या कळूं लागल्या होत्या !

( ती ' बायकांच्या जल्माला ' आली असल्याचं ती अगदीं तीनचार वर्षांची होती तेव्हांपासून ऐकत आली होती !...त्या नेहमींच्या महान् संस्कारानें तिचं मन अगदीं दुबळं व्हावं...यांत नवल नाहीं ! )

तत्व व व्यवहार यांच्यातील उभा वाद उठतां बसतां दिसत असतां तिचं दुर्बल झालेलं मन प्रवाहपतित कां होणार नाहीं ?...

तेव्हां शेवटीं व्हायचा तोच परिणाम झाला !

स्वतःच्या कोणत्याही बाबतींत स्वतःपेक्षां वडील माणसांच्या मतांनाच ती जास्त किंमत देऊं लागली ! आपल्या आयुष्याचं होईल तें होऊं द्यायचं हें तिनें ठरवल्यासारखंच होतं !

नि यालाच वडील माणसांच्या शब्दकोशांत ' अगदीं आज्ञाधारक पोर ' ही गुणवाचक प्रतिशब्दांची जोडगोळी सांपडते !

" बायकांचा जन्म व्यर्थच नाहींतर काय ?" असं मधून मधून ती स्वतःशीं घुटपुटे;...तरी...' कसंबसं एकदां लग्न होणं हीच बायकांच्या जन्माची इतिकर्तव्यता का ?' असा तिला अजूनही पुनः पुनः प्रश्न पडे !!

–१०–

मग कांहीं दिवसांनीं प्रदर्शनं सुरू झालीं !

फोटो गेले;...लोक आले !

ते चहा चिवडा खाऊन, वर वाचून चाळून घेऊं लागले कालिंदीकडून !

आपण स्त्री हें आतां कालिंदी जास्त जास्त ओळखूं लागली...

शेवटीं, एके दिवशीं ' लग्न–सौदा ' पटला !...देवाणघेवाण—( घेवाण कांहींच नव्हती; सारी देवाणच—) ठरली !!...

नवं लुगडं, नवा पोलका–कधीं वेणी तर कधीं अंबाडा—( ' पहावयास ' घेणाऱ्याला पसंत पडण्यासाठीं त्याच्या मताप्रमाणें नि वयाप्रमाणें तर दिसली

पाहिजे ती !...त्या शिवाय पटायचं कसं ? )—ह्या सर्व तऱ्हा आतां थांबल्या !...

मुहूर्त मुक्रर झाला !...रामभाऊंना नि बाकी सर्वांना हायसं वाटलं !...

स्वःची जबाबदारी बाजूस झाली कीं संपते अशी बऱ्याच जणांची कल्पना असते ! पुन्हां असं...' श्रीमंत, पदवीधर जांवईबुवा !...आतां कालिंदीचं आणखी चांगलं चांगलं तें दुसरं काय व्हायचं ? ?'...

सारीं समाधान व्यक्त करीत होती; आणि कालिंदीलाही आपल्या आयुष्यांत कांहींतरी नवीन झाल्यासारखं वाटल्यावांचून राहिलं नाहीं !...

मग पांचपन्नास मंडळी जमली; दंभ व स्वार्थ बऱ्याच प्रामुख्यानें वावरले; आणि त्या ' सुमुहूर्ता ' वर कालिंदीचं लगीन झालं एकदांचं !...

## -११-

तिच्या गळ्यांत माळ घालतांना पतिराजांना कांहीं वाटलं असेल का ?

पण कालिंदीच्या हातांतील माळ मात्र थरथर कांपत होती !...

कपाळावर धर्मबिंदू चमकत होते !...हृदय धड्धड् आवाज करीत होतं !

तरी पण कालिंदीला स्वतःच्या हृदयांतील धडधडाटापेक्षां वऱ्हाडी मंडळीचा कलकलाटच जास्त मोठ्यानें ऐकूं येत होता !

आणि आपल्या आयुष्यांत एक अति नाविन्यपूर्ण अशी घटना झाली याचा तिला तिच्या नकळत आनंदही होत होता !

असेल त्यांत सुख मानून घेण्याच्या प्रवृत्तींतच पुष्कळशा मानवी सुखांची उत्पात्ति असते !...नाहीं कां ?...

तेव्हां मग लगेंच कालिंदी आपल्या घरच्या नवीन वातावरणांत गेली !...

तिला नवे नवे अनुभव येत होते !

प्रथम पतिदृष्टिभेट ,...नंतर भाषण...नंतर थोडासा सहवास...

–११–

ज्या रात्रीं ती प्रथमच घरांतील काम आटोपून, पतीच्या खोलींत गेली तो प्रसंग ! ' यावं ! ' तिचा हात हातीं घेऊन तिचं स्वागत झालं !

तिचे पतीच सारखे बोलत होते; आणि ती खालीं मान घालून फक्त मधून-मधून ' अंऽहं ! हूंऽ ! ' असं करीत ऐकत होती !...

तिचं हृदय जोरानें धडधडूं लागलं;–तिला अननुभूत आनंद वाटत होता !

पतीच्या प्रथम स्पर्शाला ती प्रथम खूप घाबरली !

पण आपण अतिशय सुखी आहोंत अशीच तिची कल्पना होती त्याक्षणीं...

असे सुखाचे वाटणारेही कांहीं दिवस गेले !

आणि मग निसर्गानें तिच्या जीवनातला पुढला पल्ला गांठला ! !...

काम करतां करतां मधूनच तिला चक्कर आल्यासारखं होई !...

बाकीचंही सर्व तिला हळूहळू समजून आलं !...

यावेळींहि सुरवातीस लोकांना कळेल, म्हणून उगीचच वाटणारी थोडीशी लाज तिच्या चेहऱ्यावर पसरलेली दिसे !...

–१२–

आणि योग्य वेळीं तिच्या आयुष्यांतील आणखी एक स्थित्यंतर–स्त्रीजातीचं पूर्णत्व–घडून आलं !

तथापि, तिच्या कन्येच्या ' मुलगीपणा ' बद्दल तिला आपल्या जन्माच्या वेळेप्रमाणेंच कुरकुर ऐकूं आली ! !...

कोणत्याहि गोष्टीच्या नाविन्यांत आनंद असतो;...हळूहळू भ्रमनिरास होतो ! थोड्याच दिवसांत कालिंदीच्याहि तो सर्व लक्षांत आलं !

त्या घरीं आपलं कांहीं नाहीं....तर या घरीं तरी असेल,...अशी कालिंदीची समजूत होती.

पण दुरून साजरे दिसणारे बरेचसे डोंगर जवळून काजरेच असल्याचं तिला समजलं! मध्यें कांहीं दिवस वाटणारा आनंद थोडा थोडा लोपत गेला!

## —१३—

सुरवातीचं दोघांतलं शारिरिक आकर्षण आटलं होतं! नि दोघांत मानसिक आकर्षण होतं किं काय याबद्दल मोठा वाद होता!!...

संस्कारांनीं झालेलं दुबळं मन! पण तेंही कधीं कधीं बंड करण्याचा प्रयत्न करी!...

सामाजिक बंधनाची तिच्या गळ्यांतली सांखळी मात्र तिचा पाय मागें ओढी!

लहानपणापासूनच ती प्रवाहपतिताप्रमाणें वागत आली होती;...पण आतां मात्र ती खरीखुरी प्रवाहपतित झाली! कां कोण जाणें, 'बायकांचा जन्म वाईट' असं आतां तिलाहि मनापासून वाटूं लागलं होतं!!

आमच्या आर्यस्त्रिया महान् विनयवती, पतिव्रता! प्रसिद्धीच असते तशी!

...(विशेषतः आमचे पुरुषच हे जास्त अभिमानें सांगतात!!)

कालिंदी त्या पैकींच एक!—

## —१४—

आपल्या चिमुकलीला स्वैरपणें हातपाय हलवतांना पाहून तिचं हृदय वात्सल्यानें भरून येई!...

विचार करतां करतां, तिच्या भरल्या डोळीं स्वतःच्या आतांपर्यंतच्या आयुष्यांतील प्रसंग येत!...

भोंवतालच्या एककल्ली, पक्षपाती, वातावरणांत मनं किती दुबळीं होऊं शकतात हें तिला आतां स्वानुभावानें समजलं होतं!

...म्हणूनच ती आपल्या चिमुकलीचा गालगुचा घेऊन हंसण्याचा प्रयत्न करीत म्हणे-"बाळे, तुझ्या नाहीं ना ग नशीबीं पुन्हां तोच इतिहास?"

[८]

## -:घरोघरच्या देवी:-

## —स्त्रिया—

—१—

आम्ही माणसं तशीं निसर्गतः अगदीं निरुपद्रवी!–पण मग प्रत्येक व्यक्ति विभिन्न व्यक्तित्वाची!...

तेव्हां अर्थातच...एकाच जगांत, एकाच जागेत सामावून घ्यायचं म्हटल्यावर भांड्याला भांडं आटपतंच!...

आणि एक घटकाही या प्रकारला खंड पडत नाहीं!

कांहीं भांड्यांना लहानसान पोचे पडतात;.....कांहींना खूप मोठे पडतात!—

पण त्यांचा दुःखद कारुण्यपूर्ण परिणाम असा; कीं...म्हणजे इतर अनेक लहानमोठ्या भांड्यांचा भार डोक्यावर सहन करून, कांहीं भांडीं स्वतः मात्र साफ दडपून—चपटून जातात!

हो, त्यामुळेंच त्यांच्याकडे कोणाचं कधीं लक्षही वेघलं जात नाहीं.

अशीं दडपलेलीं भांडीं मानवी समाजांत—संसारांत सांपडतात;—तीं म्हणजे मुख्यतः स्त्रिया!...आर्य स्त्रिया!!—

खरंच!-स्त्रीजीवन मोठं उदात्त, गमतीचं!...पण तितकंच हृदय-विदारकही (तरीही तें अत्यंत दिव्यच आहे!...)

—२—

पोरपणींही तिची किंमत 'घराबाहेर जाणारी' म्हणून नाक मुरडण्यासारखी;

फ्रॉक टाकून नुसती परकरी झाली कीं ती ' जाणती ';...तशी ती लौकर जीवन जाणूं–जगूं शकते !—

पण म्हणूनच आमच्या सामान्य स्त्रीला मतं नसतात,...भावना नसतात !—

साडी नेसूं लागली, कीं, ती बापाच्या भावना व त्याची मतं, त्याचे बेत व त्याची अब्रू हींच सर्व आपलीं असं मानून चालते !—भविष्याच्या उदरांत तिला आशेचे अंधुक किरण दिसतात.

तिला त्यावेळीं मनांतल्या मनांत वाटतं, ' आपलं खरं आयुष्य अजून पुढेंच आहे; तें अजून सुरू व्हावयाचं आहे !—आपला पति ...आपला संसार... आपलं घर...आपलीं मुलंबाळं ! '...

खरंच !—या मानसिक आशापूर्ण गोंधळांतूनच, लग्नासारख्या बाबीची आयुष्यांतील एक लॉटरी करण्याचा तिचा बेत होतो. ती आपलं ' प्रदर्शन ' करून घेऊं शकते !—

' आपला पति...आपलीं मुलं...आपलं घर...'

## –३–

पण तिचीं तीं स्वप्नंही हळू हळू विरल होतात;...लग्नानंतरच्या छोट्या काळांतच तिला मनोमय अंजन मिळतं. विकारी...स्वार्थी, अप्पलपोटी, स्वयंकेंद्रित पुरुषी अरेरावी म्हणजेच स्त्रीच्या जीवनांतील संसार–छत्र !...

तिला तिचं असं घर नसतं. बापाचं घर दूर झाल्यावर तिला आतां फक्त नवऱ्याचं तेवढंच घर असतं !...

आणि म्हणूनच...आपलीं मतं, आपल्या भावना,...यांचा हळूहळू तिला विसर पडतो. आतां नवऱ्याची अब्रू, त्याच्या भावना, त्याच्या इच्छा, त्याचीं मतं, ..यांनांच तीं आपलीं समजून त्यांना मान वाकवते.

हळूहळू तिच्या अगदीं अंगवळणीं पडून, शेवटीं त्यांतच ती रुळते !

—४—

पुन्हां एकदां पुढील....भवितव्याच्या उदरांतील...मृगजळावर ती चालू काळची आपली इच्छा–आकांक्षांची व्यक्तिगत दैनंदिन तहान भागवते!... आपल्या मुलांच्या लीला...त्यांच्या क्षुल्लक लहरी...त्यांच्या खस्ता... यांपुढेंच ती अनुकंपायुक्त आनंदानें आपलं मन त्या वर्तमानकाळांत रमवते. तीं वाढतील...आपले कोडपांगपुढें पुरवतील-फेडतील-हीच फक्त एक अत्यंत सूक्ष्म भावना आली तर तिच्या मनांत कधीं कधीं येते!

आपल्या वाढत्या मुलांचं–वयाचं व योग्यतेचं–मोठेपण तिनें अगदीं पळापळानें मोजलेलं असतं. निरपेक्ष आनंदानें त्यांचं तिनं पुनः पुन्हा कौतुक केलेलं असतं;...पग तरी शेवटीं...मुलाचे हात ढुंगणाला पोहोंचतांच त्यांची स्वयंकेंद्रित दृष्टी हळूहळू पुढें पाहूं लागते. तरुण मन...तरुण शरीर नेहमीं पुढेंच पहाणार!...

बापडी माता!–मुलगे हळू हळू तरुण होत गेलेले असतांना, त्यांनाच आपलं सत्व सर्व दृष्टींनें अर्पण करून झपाट्यानें शरीर म्हातारं होत गेलेली त्यांची ती माता!...

ती मात्र त्यांच्यामागून मुग्ध आशेनें चालत येत असते; पण याचं त्यांना भानही नसतं!—

—५—

त्यांच्या बेदरकार तरुण मनाला त्याची किंचितहि कल्पना नसते! अर्थातच तिनें वाढवलेल्याच त्या तरुणांच्या, तारुण मनांतील, 'मी–माझी–माझं' हें नैसर्गिक समीकरणहि तिला मुग्धपणेंच अखेर पुन्हां एकदां गिळावं लागतं; वर वर हसत आपल्या पोटांतील तो दुःखाचा डोंब आपल्याच अश्रूंनीं तिला शेवटीं विझवावा लागतो!—नव्हे, विझवण्याचा हतबल प्रयत्न तिला करावाच लागतो!

•

पण मग त्या दृश्याकडेही–आपल्या आयुष्याच्या उताराच्या वेळीं–धीरानं व एका न्याऱ्या निरपेक्षतेनें पहाण्यास देखील शेवटीं ती डगमगत नाहीं !—

तिचं जीवन त्यांतच सामावलेलं आहे;...तिचं सुख त्या साऱ्यांच्या सुखांतच सामावलेलं आहे;...अशीच, हीच जणूं काय तिची नैसर्गिक भूमिका असते !–

कन्या...पत्नी...माता...सर्व भूमिकांतून जातांना...अभावितपणें ती एकच ...मुख्यतः मातेच्याच...दयार्द्रवृत्तीनें वागत असते !...

—६—

नि तें खरंच आहे !...स्त्री ही कोणत्याही वयांत माताच असते !...

माता ! हो माता म्हणजे निःस्वार्थी त्याग–नि हेंच स्त्रीचं जीवन !...

ती सुशिक्षित–अशिक्षित कशीही असो;...कितीही विकारी...स्खलनशील असो;...स्त्री ही जगन्माता आहे !...तिच्यातच ब्रम्हा–विष्णु–महेश वसत असतो.

स्त्रियांच्या दुव्यादुव्यानेंच जग वाढतं–जगतं, वाढलं–जगलं,...वाढेल—जगेल !...

—स्त्रीचा विकार जग निर्माण करतो !—
—तिचा त्याग जगाचा प्रतिपाळ करतो !—
—तिचा विचार जगांतील दिव्यत्वाची वाढ करतो !!—

IRBK-0103589
IRBK-0103589